
**सुविचार**
भय को दूर भगाने के लिए ज्ञान व विवेक की प्राप्ति ही एकमात्र उपाय है।


विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक **यशवंत**



✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/बुधवार दि. २ ऑक्टेबर २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-२१६ ✦पृष्ठे८✦किंमत १ रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


# महाराष्ट्रात २०२९ ला एकट्या भाजपाचे सरकार येईल

मुंबई : गेल्या ६० वर्षांत प्रथमच सलग ३ वेळा सरकार बनविण्याचा विक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे. महाराष्ट्रातही महायुतीचंच सरकार येणार ही काळ्या दगडावरची रेघ आहे. महायुतीला रोखण्याची ताकद कुठल्याही पक्षात नाही; पण गाफील राहू नका, फाजील आत्मविश्र्वास बाळगू नका. लोकांपर्यंत जा, महाराष्ट्रातील मतदानाची टक्केवारी वाढवा, १० टक्के मतदान वाढले की विजय महायुतीचाच होईल, असा दावा करताना, महायुतीची सत्ता आल्यास महाराष्ट्रात समान नागरी कायदा आणण्याची घोषणा भाजपा नेते व केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज मुंबईत केली. या निवडणुकीत महायुतीचे तर २०२९ मध्ये एकट्या कमळाचे राज्य येईल, असा दावाही त्यांनी केला.

लोकसभेला दणका बसल्याने भाजपाचे चाणक्य म्हणून परिचित असलेल्या अमित शहा यांनी महाराष्ट्रावर आपले लक्ष केंद्रित केले आहे. भाजपची निवडणूक रणनिती ठरवण्यापसून ते महायुतीतील जागावाटप अंतिम क र ण्या पर्यं त अमित शहा यांची भूमिका आहे.



गेल्या आठवड्यात नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिकमध्ये भाजपच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधल्यानंतर अमित शहा हे आज मुंबईच्या दौ-यावर आले आहेत. आज त्यांनी दादरच्या योगी सभागृहात भाजपचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांच्याशी संवाद साधत विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर कार्यकर्त्यांचा आत्मविश्र्वास वाढविण्याचा प्रयत्न केला. बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे महाराष्ट्र प्रभारी भूपेंद्र यादव, अश्र्विनी वैष्णव, भाजपचे राष्ट्रीय सहसंघटन सरचिटणीस शिवप्रकाश, भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्यासह पक्षाचे खासदार, आमदार, कार्यकर्ते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकसभा निवडणुकीतील अपयशाने आलेली निराशा झटका आणि कामाला लागा. प्रत्येक बुथवर किमान २० लोकांना भाजपचे सदस्य करा. प्रत्येक बुथवर आपले १० कार्यकर्ते हवे आहेत. या कार्यकर्त्यांना दस-यापासून विधानसभा निवडणूक प्रचार संपेपर्यंत कामात व्यग्र ठेवा. आपल्या विचारांचे मतदार मोठ्या संख्येने मतदानाला उतरवा. आपले मतदान १० टक्क्यांनी वाढल्यास विजय आपलाच आहे, अशा सूचना देत केंद्रीय गृहमंत्री तथा भाजपचे नेते अमित शहा यांनी मंगळवारी भाजप कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवला. राज्यात महायुतीचेच सरकार सत्तेवर येणार असल्याचा विश्र्वास व्यक्त करत शहा यांनी २०२९ च्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपचे स्वबळावर सरकार आणण्याचे लक्ष्य कार्यकर्त्यांना दिले.

जे सरकार काम करत तेच सरकार पुन्हा निवडणूक जिंकते त्यामुळे देशात आपण सलग तिसरे सरकार बनवू शकलो. आता महाराष्ट्रातील विधानसभा **(पान ५ वर)**

# महाराष्ट्रातील बीआरएस गट शरद पवार गटात विलीन

पुणे : एकीकडे महाविकास आघाडी आणि महायुतीत जागावाटपांवरून बैठकांचे, चर्चांचे सत्र सुरू आहे. तर दुसरीकडे संभाजीराजे छत्रपती, राजू शेट्टी आणि बच्चू कडू एकत्रितपणे परिवर्तन महाशक्ती तिसरी आघाडी करत सक्षम पर्याय देण्यासाठी कंबर कसून तयारीला लागले आहेत. यातच मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा मुद्दा चांगलाच तापताना पाहायला मिळत आहे. मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण असेल, यावरून महायुती आणि महाविकास आघाडीत चढाओढ असल्याचे दिसत आहे. यातच आता लाखो कार्यकर्ते असलेला एक पक्षच शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये विलीन होणार असल्याचे सांगितले जात आहे.



तेलंगणचे माजी मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनी महाराष्ट्रात भारत राष्ट्र समितीची बीजे रोवली. परंतु, तेलंगण येथे झालेल्या विधानसभा निवडणुकीत बीआरएसचा दारूण पराभव झाला. महाराष्ट्रात प्रचंड मोठा ताफा घेऊन येऊन के. चंद्रशेखर राव यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन केले होते. अनेक नेते, पदाधिकारी आणि लाखोंच्या संख्येने कार्यकर्त्यांनी या पक्षात पटापट प्रवेश केले. परंतु, याच पक्षाच्या पदाधिका-यांनी आता सगळे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. यासाठी तारीखही ठरविण्यात आली आहे. महाराष्ट्रातील आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर ही मोठी घडामोड मानली जात आहे.

शेतक-यांसाठी अतिशय उत्कृष्ट काम तेलंगण राज्यात झाले. तसेच बाकीच्या घटकांसाठी झालेले काम पाहून आम्ही **(पान ५ वर)**

# मंदिर असो वा दर्गा, बेकायदा बांधकाम जमीनदोस्तच होणार

नवी दिल्ली : - सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी (१ ऑक्टोबर २०२४) बुलडोझर कारवाई प्रकरणाची सुनावणी झाली. या दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने अतिक्रमणाबाबत आपली भूमिका स्पष्ट केली. सार्वजनिक सुरक्षा सर्वोपरि आहे. रस्ते, जलकुंभ किंवा रेल्वे रुळांवर अतिक्रमण करणारी कोणतीही धार्मिक इमारत हटविली पाहिजे. भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे, बुलडोझर कारवाई आणि अतिक्रमणविरोधी मोहिमेचे निर्देश सर्व धर्मातील नागरिकांसाठी असतील, असे न्यायालयाने म्हटले.



बुलडोझरवरील बंदी कायम ठेवत सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, ते अवमान करणा-यांकडून नुकसान भरपाई वसूल केली जाईल. कायद्यानुसार कारवाई न केल्यास पीडितांची मालमत्ता परत करण्यात येईल आणि त्याची भरपाईही दोषी अधिका-यांकडून वसूल केली जाईल. आपण धर्मनिरपेक्ष देश आहोत, आपची मार्गदर्शक तत्त्वे देशातील प्रत्येकासाठी लागू असतील. मंदिर, दर्गा किंवा गुरुद्वारा असो, ते काढून टाकले जाईल. कारवाईपूर्वी त्या कुटुंबाला अन्यत्र राहण्यासाठी **(पान ५ वर)**

# लेबनॉनमध्ये चार हजार भारतीय नागरिक अडकले

नवी दिल्ली : पेजर आणि हवाई हल्ले करून इस्रायलने लेबनॉनमध्ये हाहाकार उडवून दिलेला असताना मंगळवारी रात्री लेबनॉनच्या हद्दीमध्ये सैन्य घुसविले आहे. इस्रायली सैन्याचे हजारो सैनिक रातोरात लेबनॉनमध्ये रणगाडे, रॉकेट लाँचर घेऊन घुसले आहेत. आयडीएफने मंगळवारी पहाटे याची माहिती जगाला दिली, यामुळे परिस्थिती आणखी चिघळली आहे.



ग्राउंड स्ट्राइक सुरू होण्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्याशी फोनवर चर्चा केली. शांतता प्रस्थापित करण्यासाठी दहशतवादाचा नायनाट कसा करणे आवश्यक आहे यावर दोन्ही नेत्यांनी चर्चा केली.

इस्रायलच्या या कारवाईमुळे जगभरात खळबळ उडाली असून अनेक देश आपल्या नागरिकांना बाहेर काढण्यासाठी धडपडत आहेत. या युद्धामुळे भारतानेही आपल्या नागरिकांना लेबनॉनमध्ये न जाण्याचा सल्ला दिला आहे.

लेबनॉनमध्ये ४००० हून अधिक भारतीय आहेत आणि केंद्र सरकारने सर्वांना लवकरात लवकर बाहेर पडण्याचे आवाहन केले आहे. बैरूतमधील लेबनॉनमध्ये राहणारे भारतीय नागरिक बांधकाम क्षेत्र, कृषी, फार्मा इत्यादींमध्ये काम करतात.

भारतीय दुतावासाने याबाबत प्रतिक्रिया देताना म्हटले, १९७५ ते १९९० च्या गृहयुद्धादरम्यान भारताने इतर देशांच्या दूतावासांप्रमाणे बैरूतमधील आपला दूतावास खुला ठेवला आहे. भारतीय दूतावासाने सर्व भारतीय नागरिकांना **(पान ५ वर)**

# गरीब विद्यार्थ्यासाठी उघडले आयआयटी चे दार

नवी दिल्ली : सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी विशेषाधिकारांचा वापर करत केवळ आर्थिक परिस्थितीमुळे प्रवेशापासून वंचित राहणा-या उत्तरप्रदेशातील मुझफ्फरपूर जिल्ह्यातील खतौली गावातील दलित विद्यार्थ्यासाठी आयआयटी धनबादचे दार खुले केले. ङ्गएवढी मोठी प्रतिभा केवळ पैशांच्या अभावी वाया जाता कामा नये,फ अशी टिपणी करत सरन्यायाधीशांनी संबंधित विद्यार्थ्याला भावी करिअरसाठी शुभेच्छाही दिल्या. भारतीय न्यायव्यवस्थेच्या इतिहासात प्रथमच असा प्रसंग घडला आहे.

जेईई-ॲडव्हान्सची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर आयआयटी प्रवेशासाठी अतुल कुमार याने समुपदेशनाला हजेरी लावली होती. यानंतर त्याचा आयआयटी धनबादमध्ये प्रवेशही निश्चित झाल्याचे सांगण्यात आले होते. या प्रवेशासाठी २४ जून रोजी सायंकाळी पाच वाजेपर्यंत शुल्क जमा करण्याची मुदत होती. घरची परिस्थिती गरिबीची असल्यामुळे त्याने गावातील लोकांची मदत मागितली. मात्र, पैसे भरेपर्यंत शुल्क जमा करण्यासाठीचे सर्व्हर बंद झाले होते. शुल्क भरायच्या केवळ चार सेकंद आधी संबंधित सर्व्हर बंद झाले होते.

प्रवेश न मिळाल्यामुळे अतुल कुमार याने झारखंड उच्च न्यायालयात दाद मागितली होती. त्याला तेथे दिलासा न मिळाल्यामुळे त्याने सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले होते. आपल्या अशिलाचे **(पान ५ वर)**

## संभाजीराजेंच्या स्वराज्य संघटनेला राजकीय पक्ष म्हणून मान्यता

कोल्हापूर : प्रतिनिधी- संभाजीराजे छत्रपती यांच्या स्वराज्य संघटनेला भारतीय निवडणूक आयोगाने राजकीय पक्ष म्हणून मान्यता दिली आहे. स्वराज्य संघटनेची आयोगाकडे ङ्गमहाराष्ट्र स्वराज्य पक्षफ अशी नोंदणी झाली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीसाठी या पक्षाला ङ्गसप्तकिरणांसह पेनाची निबफ हे निवडणूक चिन्ह दिले आहे. संभाजीराजे छत्रपती यांनी मंगळवारी फेसबुक पोस्ट करत ही माहिती दिली.

निवडणूक आयोगाने महाराष्ट्र स्वराज्य पक्षाला राजकीय पक्ष म्हणून मान्यता दिल्याची फेसबुक पोस्ट संभाजीराजे छत्रपती यांनी केली आहे. **(पान ५ वर)**

# मुंबईकरांच्या हक्काच्या जागा बळकवायचा सरकारचा अजेंडा

मुंबई : प्रतिनिधी- केंद्र सरकारने मिठागरांची २५६ एकर जागा देण्यास मंजुरी दिल्यानंतर राज्य सरकारने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर इथे धारावीतील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यास मान्यता दिली. राज्य सरकारच्या या निर्णयाला काँग्रेसने विरोध केला आहे. मुंबईकरांचा आणि पर्यावरणवादी यांचा प्रखर विरोध असताना राज्य मंत्रिमंडळाने पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील असणा-या मिठागरांच्या जमिनी धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या आडून फक्त अदानींच्या फायद्यासाठी देण्याचा निर्णय घेतला, अशा शब्दांत वर्षा गायकवाड यांनी निर्णयावर टीका केली.

वर्षा गायकवाड यांनी म्हटले आहे की, शिंदे सरकार अदानीचे एजंट बनून काम करत आहे. अदानी यांना संपूर्ण मुंबई गिळायची आहे आणि त्यासाठी वाट्टेल त्या थराला जाण्याची, लागेल ते करण्याची भूमिका या महाभ्रष्ट सरकारची आहे. अदानींचे एजंट बनून हे सरकार काम करत आहे. मुंबईकरांचे हक्क मारायचे, मुंबईचे महत्त्व कमी करायचे आणि मुंबईकरांच्या हक्काच्या जागा बळकवायच्या, हा या सरकारचा अजेंडा आहे, असा गंभीर आरोप महायुती सरकारवर गायकवाड यांनी केला.

वर्षा गायकवाड पुढे म्हणाल्या की, हे सध्या देऊ केलेले २५६ एकर नव्हे, तर मुंबईतील सगळ्या मिठागर जमिनी यांच्या बिल्डर मित्राच्या घशात घालण्याचे कांड आहे, असे माझे स्पष्ट म्हणणे आहे. मुंबई महानगर क्षेत्रात ५,३७८ एकरहून अधिक त्यापैकी जवळपास ३०-३५ टक्के, अर्थात १५०० एकर मिठागर जमिनी बिल्डरांसाठी लंपास करण्याचा हा डाव आहे. हा लाखो कोटींचा घोटाळा आहे आणि पर्यावरणदृष्ट्या मुंबईला याचे भयंकर परिणाम सोसावे लागू शकतात, असा इशारा वर्षा गायकवाड यांनी दिला.

मोदानी अँड कंपनीचा एक हजार कोटींचा घोटाळा **(पान ५ वर)**

## गोविंदा जखमी

मुंबई : प्रतिनिधी- हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते गोविंदा यांच्याकडून चुकून बंदुकीची गोळी झाडली गेल्याची माहिती समोर आली आहे. स्वत:च्या बंदुकीतून गोळी सुटल्यामुळे गोविंदा जखमी झाला आहे. ही गोळी गोविंदाच्या पायात शिरली. त्यामुळे आता गोविंदा यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. बॉलिवूड अभिनेता गोविंदा यांच्याकडून मिसफायर झाल्याची माहिती मिळत आहे. स्वत:च्याच बंदुकीतून सुटलेली गोळी गोविंदाला लागली, त्यामुळे गोविंदाला रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्या पायावर तात्काळ शस्त्रक्रिया पार पडल्याची माहिती मिळत असून गोविंदा यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळत आहे.



**राजस्थानचे नुतन राज्यपाल महामहिम श्री. हरिभाऊ बागडे हे लातूर मुक्कामी आले असता त्यांची भेट घेतली. डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, श्री. प्रदीप नणंदकर, श्री. प्रवीण देशमुख, श्री. जगन्नाथ पाटील.**

# घड्याळ चिन्हावरून सर्वोच्च न्यायालयाची 'तारीख पे तारीख'

नवी दिल्ली : राज्यात विधानसभा निवडणुकांची घोषणा काहीच दिवसात होऊ शकते. सर्व पक्षांनी यासाठी तयारी सुरू केली आहे. जागावाटपाच्याही चर्चा सुरू आहेत. तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पक्षाला दिलेल्या चिन्ह आणि नावाच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरोधात शरद पवार गटाने सुप्रीम कोर्टात धाव घेतली. तेव्हापासून खटला सुप्रीम कोर्टात प्रलंबित आहे. आज चिन्हाबाबतीत सुनावणी होणार होती. पण आता पुन्हा ही सुनावणी पुढे ढकलण्यात आली आहे. आता सुप्रीम कोर्टात ही सुनावणी १५ ऑक्टोंबर रोजी होणार आहे.

राष्ट्रवादीतील आमदार अपात्र आणि घड्याळ चिन्हाबाबतची सुनावणी सुप्रीम कोर्टाने पुढे ढकलली आहे. ही सुनावणी १५ ऑक्टोंबरपर्यंत पुढे ढकलली आहे. या सुनावणीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला घड्याळ चिन्ह कायम राहणार की पुन्हा नवीन चिन्ह मिळणार हे स्पष्ट होणार आहे. जून महिन्यात झालेल्या लोकसभा निवडणुकीत सुप्रीम कोर्टाने काही अटींवर घड्याळ चिन्ह वापरण्यास परवानगी दिली होती. दरम्यान, आता सुप्रीम कोर्ट घड्याळ चिन्हाबाबत कोणता निर्णय देत हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. राज्यात काही दिवसातच विधानसभेच्या निवडणुका जाहीर होऊ शकतात. त्यामुळे आता या चिन्हाचा निर्णय महत्वाचा मानला जात आहे.

मागील वर्षी राष्ट्रवादी काँग्रेसमधील नऊ नेत्यांनी शिंदे-फडणवीस सरकारमध्ये मंत्रिपदाची शपथ घेतली. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस उभी फूट पडल्याचे समोर आली आहे. ४० हून जास्त आमदार अजित **(पान ५ वर)**

# लातूर ग्रामीण भाजपाकडेच राहील मागील चूक यावेळी होणार नाही

## भाजपा पक्षनिरीक्षक माजी मंत्री बबनराव लोणीकर यांचे प्रतिपादन




**लातूर / प्रतिनिधी-** लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात गेल्यावेळी भाजपाचा विजय निश्चित होता मात्र काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांच्यात छुपा समझोता झाल्याने हा मतदार संघ सेनेच्या वाट्याला गेला. मागील चूक यावेळी होणार नाही. येणाऱ्या निवडणुकीत लातूर ग्रामीण भाजपचाच असेल आणि भाजपाच ताकतीने निवडणूक लढवेल असे भाजपाचे पक्ष निरीक्षक माजी मंत्री बबनराव लोणीकर यांनी बोलून दाखविले. दरम्यान लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातून आ. रमेशआप्पा कराड यांनाच भाजपाने उमेदवारी द्यावी अशी एकमुखी मागणी मतदार संघातील जवळपास सर्वच पक्ष पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी यावेळी केली.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातून भाजपा पक्षाची उमेदवारी कोणाला देण्यात यावी यासाठी पक्षाचे निरीक्षक माजी मंत्री बबनराव लोणीकर यांनी मंगळवारी दुपारी भाजपाच्या संवाद कार्यालयात पक्ष पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्याकडून व्यक्तिगत संवाद साधून प्रत्येकाची भावना जाणून घेतली. यावेळी बहुतांशी पक्षाच्या पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी आ. रमेशआप्पा कराड यांनाच लातूर ग्रामीण मतदार संघातून उमेदवारी देण्यात यावी अशी एकमुखी मागणी पक्ष निरीक्षक बबनराव लोणीकर यांच्याकडे केली. तत्पूर्वी उपस्थित कार्यकर्त्यांना माजी मंत्री लोणीकर यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रम शिंदे, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, लातूर तालुका अध्यक्ष बन्सी भिसे, रेणापूर तालुका अध्यक्ष दशरथ सरवदे यांच्यासह पक्षाचे विविध पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, विविध समितीचे सदस्य प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लाडक्या बहिणींचे पैसे कापणाऱ्या बँकांवर कारवाई

मुंबई : मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ दरमहा पात्र महिलांना देण्यात येत आहे. या लाभातून काही बँका मिनिमम बॅलन्स, ईसीएस मँडेट रिटर्न, चेक रिटर्न यासारखे शुल्क आकारून महिलांच्या बँक खात्यातील लाभाची रक्कम कपात करतात. सेवा शुल्काच्या नावाखाली रक्कम कपात करणा-या अशा बँकांवर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती महिला आणि बाल विकासमंत्री आदिती तटकरे यांनी मंगळवारी येथे दिली.

आदिती तटकरे यांनी आज मंत्रालयात मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजनेचा राज्यस्तरीय आढावा बैठक घेतला. या बैठकीत बोलताना तटकरे यांनी, काही पात्र महिलांच्या बँक खात्याला आधार सिडींग नसल्याने लाभ मिळत नाही. याबाबत अंगणवाडी सेविका, मदतनिस यांच्या मदतीने २ ते ७ ऑक्टोबर या कालावधीत विशेष मोहीम राबवावी. बँकेशी संबंधित अडचणी संदर्भात स्थानिक पातळीवर बैठका घ्याव्यात, अशा सूचना बैठकीत उपस्थित जिल्हा महिला आणि बाल विकास अधिका-यांना दिल्या. नांदेड जिल्ह्यात प्रत्यक्षात अर्ज भरताना लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरले आणि पुरुषांचे आधार क्रमांक, खाते क्रमांक दिले गेल्याने पुरुषांच्या बँक खात्यात पैसे जमा झाले. याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यानंतर या फसवणूक प्रकरणी गुन्हा दाखल करून ज्या केंद्रावर हे अर्ज भरले गेले त्या केंद्र चालकाविरुद्धही गुन्हा दाखल करण्याचे निर्देश तटकरे यांनी या वेळी दिले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या अंतर्गत आतापर्यंत २ कोटी ४० लाख महिलांची नोंदणी झाली असून १ कोटी ८७ लाख पात्र महिलांना लाभ देण्यात आला आहे. उर्वरित अर्जांची पडताळणी तातडीने करून घ्यावी, अशा सूचनाही आदिती तटकरे यांनी बैठकीत दिल्या. या बैठकीला महिला आणि बाल विकास विभागाचे सचिव अनुपकुमार यादव, एकात्मिक बाल विकास योजनेचे आयुक्त कैलास पगारे, सर्व जिल्ह्यातील महिला आणि बाल विकास अधिकारी यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# प्रत्येक विद्यार्थ्याचे व्यक्तिमत्व एकमेवद्वितीय असते





देगलूर (प्रतिनिधी) : विद्यार्थी हा देशाचे भवितव्य असून आजच्या विद्यार्थ्यांमध्ये देशाची भविष्यकालीन जबाबदारी पेलण्याचे सामर्थ्य असते तसेच प्रत्येक विद्यार्थी हा एकमेवद्वितीय असतो, असे मत प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी यांनी व्यक्त केले. वैकुंठवासी धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयात आय.क्यू.ए.सी. व सांस्कृतिक समितीच्या वतीने आयोजित प्राचार्य - विद्यार्थी सुसंवाद व नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत या कार्यक्रमात अध्यक्षीय समारोप प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमात प्रथम वैकुंठवासी धुंडा महाराज देगलूरकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. दिलीप भडके, उपप्राचार्य डॉ. संजय अवधाने, सांस्कृतिक समिती प्रमुख डॉ. संजीवनी नेरकर, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. प्रकाश वारे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी म्हणाले की, विद्यार्थी दशेतच विद्यार्थ्यांनी स्वतः मधील कच्चे दुवे, बलस्थान व आवड ओळखून कच्च्या दुव्याचे बलस्थानात रूपांतर करण्यासाठी प्रयत्नरत राहिले पाहिजे. या कार्यक्रमात बी. ए., बी. एस्सी. द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी बी.ए. व बी.एस्सी. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे स्वागत केले तसेच विविध विद्यार्थ्यांनी विविध कला सादर केल्या. महाविद्यालयाचे सचिव मा. राजेश महाराज देगलूरकर यांनी विद्यमान शैक्षणिक परिस्थितीबाबत विद्यार्थ्यांशी प्रश्नोत्तररुपी संवाद साधला. प्रा. शंकर पाटील यांनी हास्यकला सादर करून उपस्थितांचे मनोरंजन केले.

सांस्कृतिक समिती प्रमुख डॉ. संजीवनी नेरकर यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश व व्याप्ती कथन करून समितीच्या कार्याच्या नियोजनाबाबत तसेच वर्षभरात विद्यार्थी व्यक्तिमत्व विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर उपक्रमाची विद्यार्थ्यांना माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नारायण येरेवाड (बी. ए. द्वितीय वर्ष) व वैशाली दिंडे ( बी.एस्सी. प्रथम वर्ष) यांनी केले तर आभार गायत्री पाटील (बी.ए. द्वितीय वर्ष) या विद्यार्थिनीने मानले.

## खंडेराव कुलकर्णी यांना शिक्षक रत्न पुरस्कार



लातूर / प्रतिनिधी- मराठी भाषेचे अभ्यासक,भाषातज्ज्ञ खंडेराव कुलकर्णी यांना मराठवाडा सेवक प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा शिक्षकरत्न सन्मान जाहीर झाला आहे.

हैदराबाद मुक्तिसंग्राम : एक क्रांतिपर्व ' या त्यांच्या पुस्तकाचे प्रकाशन गोविंदभाई श्राफ यांच्या हस्ते प्रकाशन झाले होते.कुलकर्णी यांच्या ' मराठी व्याकरण : स्वरूप व चिकित्सा ' या पुस्तकास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचा ' नरहर कुरुंदकर ' भाषा विषयक पुरस्कार व मराठी अभ्यास परिषद , पुणे या संस्थेचा ' ना. गो. कालेलकर भाषाविषयक पुरस्कार प्राप्त झाला आहे.मराठी विषयाचे व्यासंगी अध्यापक म्हणून कार्य केलेल्या कुलकर्णी यांनी शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना हा सन्मान जाहीर झाला आहे. महाराष्ट्र मराठी अध्यापक संघाच्या त्रैमासिकाचे संपादक म्हणून त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे.८आक्टोबर रोजी पुण्यात या पुरस्काराचे वितरण होणार आहे. कुलकर्णी यांना मिळालेल्या सन्मानाबद्दल अभिनंदन करण्यात येत आहे.

# जिल्हास्तरीय बॉल बॅडमिंटन स्पर्धेत देगलूर महाविद्यालयाचा संघ प्रथम



देगलूर(प्रतिनीधी): क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हा क्रीडा परिषद जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नांदेडच्या वतिने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय शालेय बॉल बॅडमिंटन क्रीडा स्पर्धेत देगलूर महाविद्यालयाच्या खेळाडूंनी प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

दि १ ऑक्टोबंर रोजी नांदेड येथे क्रिडा स्पर्धा पार पडल्या यात १९ वर्ष वयोगटातील खेळाडूंचा समावेश होता.

विजयी संघातील खेळाडू कर्णधार रितेश वाघमारे,शुभम गायकवाड शिवाजी टेकाळे,संदेश पाटील, चैतन्य भंडरवार , दिपक सोनकांबळे, शैलेष हिंगोले, कपिल शिवणगे या खेळाडूने आपले वर्चस्व कायम ठेवून स्पर्धेत यश संपादन केले आहे.यशस्वी खेळाडूंचा जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या वतीने यथोचित सन्मान करून त्यांना विभागीय शालेय बॉल बॅडमिंटन क्रीडा स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.खेळाडूंना कॅप्टन निरज कुमार उपलंचवार व प्रा.सिताराम हाके यांनी मार्गदर्शन केले. सर्व यशस्वी खेळाडूंच्या यशाबदल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर,उपाध्यक्ष जनार्धन चिद्रावार,सचिव डॉ.कर्मवीर उनग्रतवार सहसचिव राजकुमार महाजन, कोषाध्यक्ष विलास तोटावार यांच्यासह संस्थेच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य देवेंद्र मोतेवार, नारायणराव मैलागिरे, सूर्यकांत नारलावार, ,गंगाधरराव जोशी, रविंद्र अप्पा द्याडे, चंद्रकांत नारलावार, गुरुराज चिद्रावार, विजय उनग्रतवार, सुभाषराव सांगवीकर, गोविंदप्रसाद झंवर यांच्यासह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ , उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार , उपप्राचार्य प्रा. उत्तमकुमार कांबळे, पर्यवेक्षक संग्राम पाटील, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी व सर्व प्राध्यापक , कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

# संजीवनी महाविद्यालयाच्या वतीने चापोलीत स्वच्छता अभियान




चापोली : चाकूर तालुक्यातील चापोली येथील संजीवनी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने चापोली ग्रामपंचायत कार्यालय परिसर व इतर ठिकाणी स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

युवा क्रीडा मंत्रालय भारत सरकार व राष्ट्रीय सेवा योजना विभाग पुणे अंतर्गत चापोली येथील संजीवनी महाविद्यालयाच्या वतीने १७ सप्टेंबर २०२४ ते २ आक्टोबर २०२४ या दरम्यान स्वच्छता ही सेवा या उपक्रमाद्वारे विविध स्वच्छतेचे उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये स्वच्छतेची शपथ, स्वच्छते विषयी मार्गदर्शन व्याख्यान, स्वच्छते ची रॅली व महाविद्यालय परिसर, सार्वजनिक ठिकाणी म्हणजेच ग्रामपंचायत कार्यालय, बस स्टॅन्ड, राष्ट्रीय महामार्ग परिसर व दैनंदिन वापराचे ठिकाण स्वच्छता करण्यात आली.

यावेळी यावेळी संजीवनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ धनंजय नारायणराव चाटे, संस्था सचिव तथा चापोली चे लोकनियुक्त सरपंच डॉ भालचंद्र नारायणराव चाटे, डॉ नारायणराव चाटे कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ सचिन घोळवे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. रंजीत चव्हाण, प्रा. रोहित चव्हाण, गणेश मदने, प्रा बालाजी घुगे सह आदी प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

# राजे शिवाजी नगर लातूर येथे शिवसेनेची शाखा स्थापना



लातूर:- राज्याचे मुख्यमंत्री शिवसेना मुख्य नेते पक्ष प्रमुख मा.एकनाथ शिंदे साहेब, मा. खासदार श्रीकांत शिंदे साहेब, शिवसेनेचे राज्य सचिव श्री.संजयजी मोरे साहेब, मराठवाडा विभागीय संपर्क प्रमुख श्री आनंदराव जाधव साहेब, लातूर लोकसभा प्रमुख श्री बालाजीराव काकडे साहेब, जिल्हा संपर्क प्रमुख अँड बळवंत भाऊ जाधव साहेब, जिल्हा महिला संपर्क प्रमुख सौ.रंजना ताई कुलकर्णी, शिवसेना जिल्हा प्रमुख सचिन दाने साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर येथे शिवसेना पक्ष व संघटनात्मक वाढीसाठी राजे शिवाजी नगर लातूर येथे शाखेची स्थापना मंगळवार दि.१ आक्टोंबर रोजी दु.१२:३० वा. जिल्हा संपर्क प्रमुख अँड बळवंत भाऊ जाधव यांच्या हस्ते करण्यात आली.

यावेळी महिला जिल्हा प्रमुख कल्पनाताई बावगे,जिल्हा प्रमुख सचिन दाने,महिला जिल्हा प्रमुख कल्पनाताई बावगे , उपजिल्हा प्रमुख सतिष देशमुख , मागासवर्गीय जिल्हा प्रमुख बालाप्रसाद सोमाणी , शहरप्रमुख परवेज पठाण, उपशहर प्रमुख विजयकुमार कांबळे ,ॲड. जिल्हा सन्मवयक वैभव सुर्यवंशी , ॲड. अर्जुन जाधव,बचत गट प्रमुख वर्षा धडे,युवा सेना जिल्हा प्रमुख कुलदिप सुर्यवंशी , उपशहर प्रमुख राजु बागवान ,अ.तालुका प्रमुख रेखाताई लोखंडे ,युवा सेना उपजिल्हा प्रमुख कृष्णा सरवदे ,युवा सेना जिल्हा सचिव गणेश पवार ,लातूर ग्रामीण युवा सेना उपजिल्हा प्रमुख धनराज शिंदे, धनु कसबे, स्वप्नील कदम ,नुतन शाखा प्रमुख श्री अभिजीत कांबळे, उपशाखा प्रमुख श्री चंद्रकांत गायकवाड ,शाखा सचिव पवन आल्टे, सहसचिव श्री सौ. अल्का कांबळे ,सदस्य बुध्दभुषण कांबळे, शुभम लोखंडे, निकिता बनसोडे, नुरजहाँ अन्सार, लक्ष्मीबाई पवार, गोजरबाई गायकवाड, धम्मपाली शेळके, स्वाती शिंदे, सटवा गायकवाड, अजय बनसोडे , केशव शिंदे आदींसह शिवसेनेचे पदाधिकारी, शिवसैनिक उपस्थित होते.

# डॉ. लक्ष्मणराव कस्तुरे यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान



लातूर / प्रतिनिधी- गोरगरीबांचे रेडिओलॉजिस्ट म्हणून लातूर पंचक्रोशीत ख्याती असलेले आणि कुटुंबात कसलीही शैक्षणिक पार्श्र्वभूमी नसताना वैद्यकीय व्यवसायात लौकिक प्राप्त केलेले येथील सुप्रसिद्ध रेडिओलॉजिस्ट डॉ. लक्ष्मणराव कस्तुरे यांना नुकतेच छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या राज्यस्तरीय रेडिओलॉजिस्ट्स परिषदेत ' जीवन गौरव पुरस्कार ' देऊन सन्मानित करण्यात आले.

परिषदेचे चेअरमन डॉ. मिश्रीकोटकर आणि राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. लोणीकर यांच्या हस्ते , रेडिओलॉजी क्षेत्रातील दीर्घकालीन समर्पित योगदानाबद्दल , डॉ. कस्तुरे यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान करुन यावेळी सपत्निक गौरविण्यात आले. या प्रसंगी रेडिओलॉजिस्ट डॉ. संदीप कवठाळे, राष्ट्रीय सचिव डॉ. एक्बाल मिन्ने यांची विशेष उपस्थिती होती. डॉ. कस्तुरे गेल्या तीन दशकांपासून लातू परिसरात तसेच येथील एमआयटी वैद्यकीय महाविद्यालयात सेवा देत आहेत. त्यांच्या या सन्मानाबद्दल खा.डॉ. शिवाजी काळगे, आयएमए चे अध्यक्ष डॉ. कानडे, सर्जिकल सोसायटीचे माजी अध्यक्ष डॉ. हंसराजजी बाहेती, डॉ. दिनकर काळे, डॉ. सोपानराव जटाळ, वसंतराव पाटील, माध्यम सामाजिक व सांस्कृतिक विचारपीठ व मजविप महानगर शाखेचे अध्यक्ष जयप्रकाश दगडे , डॉ. सोमनाथ रोडे, रामानुज रांदड प्रभृतींनी त्यांचे कौतुक केले.

## जल जीवन मिशनच्या प्रकल्प संचालकपदी मनोज राऊत

धाराशिव दि.१ (प्रतिनिधी)



- जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा जलजीवन मिशनसंचालक म्हणून मनोज बापूराव राऊत यांनी पदभार स्वीकारला आहे.

धाराशिव जिल्हा परिषदेतील उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक भागवत ढवळशंख हे सेवानिवृत्त झाल्यानंतर जूनपासून तुळजापूर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी अमोल ताकभाते यांनी अतिरिक्त पदभार स्विकारला होता. तर आता करमाळा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी राऊत यांची धाराशिव येथे बदली झाली आहे.

# ढगे, जाधव, फंड राज्यपाल राधाकृष्णन यांच्या हस्ते कृषी पुरस्काराने सन्मानित




धाराशिव दि.१ (प्रतिनिधी) - महाराष्ट्र शासनाच्यावतीने कृषी क्षेत्रात प्रगती करणाऱ्या शेतकऱ्यांना पुरस्कार देऊन गौरवण्यात येते. तुळजापूर तालुक्यातील द्राक्ष पिकून निर्यात करणाऱ्या शेतकऱ्यांना गौरविण्यात आले. यामध्ये तुळजापूर तालुक्यातील काटी येथील शुभांगी नबाजी ढगे यांना राजमाता जिजाऊ पुरस्कार, गंजेवाडी येथील सुदर्शन शिवाजी जाधव वसंतराव नाईक कृषिनिष्ठ पुरस्कार व जळकोटवाडी येथील ब्रम्हदेव महादेव फंड यांना शेतकरी पुरस्कार देऊन राज्यपाल सीपी. राधाकृष्णन यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषीमंत्री धनंजय मुंडे, आ. विक्रम काळे, कृषी सचिव जयश्री भोज व कृषी आयुक्त रविंद्र बिनवडे आदी उपस्थित होते. त्याबद्दल या शेतकऱ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

**टी.सी.हरवलीआहे**

राखी जयद्रथ कालवले या नावाची श्री महेश उच्च माध्यमिक विद्यालय शिरूर ताजबंद ता.अहमदपुर जि.लातुर येथील १२ वी पासची टी.सी. अहमदपूर-शिरूर ताजबंद प्रवासात हरवली आहे .

सदरील टी. सी. कोणास सापडल्यास खालील मोबाईलवर संपर्क करावा.

मो. नं. ७७७४९५८१३६

# पुस्तके स्वत:बरोबर जगाला बदलू शकतात : डॉ. जयद्रथ जाधव



लातूर : विद्यार्थीदशेमध्ये वाचन कौशल्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मानवाचा विकास हा वाचनातूनच झाला आहे. व्यक्तीला शहाणं व्हायचं असेल तर वाचनाशिवाय पर्याय नाही हे यापूर्वीच्या अनेक ज्ञानवंतांनी सांगितले आहे. पुस्तकं हेच खरे मित्र असतात, पुस्तकं मस्तक घडवतात, संस्कार करतात.पाठ्यक्रमाच्या व्यतिरिक्त साहित्याच्या सर्व प्रकारातील पुस्तकांचे वाचन मुलांनी विद्यार्थी दशेपासूच सुरु करायला हवं. वाचन हा आपल्या जीवनाचा स्थायीभाव आहे. व्यक्तीला परिपूर्ण करते ते पुस्तक. खरे तर वाचन ही चळवळ व्हायला हवी आणि यासाठी शिक्षकांनी पुढाकार घ्यायला हवा. मुले शिक्षकांचे ऐकतात आणि पुस्तकं मुलांना घडवतात.पुस्तकं स्वतःबरोबर जगाला ही बदलू शकतात असे प्रतिपादन साहित्यिक तथा समीक्षक डॉ. जयद्रथ जाधव यांनी केले.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन यांच्या वतीने 'महावाचन उत्सव-२०२४' हा कार्यक्रम महाराष्ट्रभर सुरू आहे. या अंतर्गत लातूर जिल्ह्यातील दहा तालुक्यांमध्ये तालुकास्तरीय ग्रंथोत्सव पुस्तक मिळावे संपन्न झाले. तसेच शुक्रवार, दि.२७ सप्टेंबर रोजी श्री किशन सोमाणी विद्यालय, लातूर येथे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मुरुड व शिक्षण विभाग जिल्हा परिषद लातूर यांच्या वतीने जिल्हास्तरीय ग्रंथोत्सव व वाचन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्ताने 'वाचाल तर वाचाल' या विषयावर व्याख्यानाचे आयोजित करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डाएटच्या प्राचार्य डॉ. भागीरथी गिरी, प्रमुख वक्ते मराठवाडा साहित्य परिषद शाखा लातूरचे अध्यक्ष डॉ.जयद्रथ जाधव, अधिव्याख्याता संतोष ठाकूर, घनश्याम पौळ,उपशिक्षणाधिकारी प्रमोद पवार, महावाचन महोत्सव उपक्रमाचे जिल्हा समन्वयक तथा साहित्यिक विवेक सौताडेकर, डॉ जगन्नाथ कापसे, श्रीमती मेनकुदळे, श्रीम. योगेश्र्वरी नाडे, गिरीश माने निशिकांत मिरकले आदी उपस्थित होते.

डॉ. जाधव पुढे म्हणाले की, वाचनाने मने सुदृढ होतात. मनुष्य ज्ञानसंपन्न होतो आणि ज्ञानसंपन्न व्यक्ती जगावर राज्य करू शकतो. जगाला बौद्ध तत्त्वज्ञान, भगवदगिता, गांधी तत्त्वज्ञान हे भारताने दिलेले आहे. बडोद्याचे राजे सयाजीराव गायकवाड यांनी भारतात पहिल्यांदा फिरते ग्रंथालय सुरू केले. वाचन म्हणजे पुस्तकाशी संवाद असून हा संवाद रोजनिशी घडायला हवा असेही प्रतिपादन त्यांनी याप्रसंगी केले.

अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. भागीरथी गिरी यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महावाचन उपक्रमाचे जिल्हा समन्वयक विवेक सौताडेकर यांनी केले. आभार अधिव्याख्याता घनश्याम पौळ यांनी मानले व सूत्रसंचालन प्रमोद हुडगे यांनी केले. याप्रसंगी शेकडो विद्यार्थी व शिक्षकांनी व्याख्यान व ग्रंथ प्रदर्शनाचा मोठ्या लाभ घेतला.

# महात्मा गांधी महाविद्यालयाने केली बसस्थानकाची स्वच्छता



अहमदपूर / प्रतिनिधी- युवक व क्रीडा मंत्रालय, नवी दिल्ली राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय कक्ष, मुंबई यांच्या निर्देशानुसार १७ सप्टेंबर ते २ आक्टोबर २०२४ हा पंधरवाडा यावर्षी स्वच्छता ही सेवा या अभियानाने राबविण्याचे सूचित करण्यात आले आहे.

त्यानुसार महाविद्यालय परिसर, रेल्वे स्टेशन, बसस्थानक, धार्मिक स्थळे, पर्यटन स्थळे अशा सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता करणे, प्लास्टिक निर्मूलन करणे संबंधी कळविण्यात आले आहे. या मोहिमे अंतर्गत येथील विचार विकास मंडळ संचलित महात्मा गांधी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने आज ३० सप्टेंबर २०२४ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग व महाविद्यालयातील विविध विभागांनी अहमदपूरच्या मध्यवर्ती बसस्थानकाची स्वच्छता केली. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. यादव सूर्यवंशी व स्टाफ सेक्रेटरी डॉ.अनिल कांबळे यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेसंबंधी मार्गदर्शन केले. याप्रसंगी बस आगार प्रमुख अमर पाटील, एन.सी.सी. कॅप्टन डॉ. अनिता शिंदे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ राजेश्री जाधव, डॉ. प्रकाश देशमुख, डॉ. बालाजी पाटील, लेफ्टनंट प्रा. जी. व्ही. ताटे, प्रा. प्रकाश डवरे, डॉ . श्याम शिंदे, डॉ. राजेश देसाई, प्रा. पी. एस. जांबेकर, डॉ. विष्णू शेळके, प्रा. दीपक पुरी, डॉ. राजेश जोंधळे व महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

## आत्मबोध २५

अर्जुनाला अनेक जन्माचे ।
साधना पुण्यप्राप्तीचे ।
तेव्हा श्रीकृष्ण संगतीचे ।
फळ मिळाले ।। १ ।।

संत, भगवंत संगती ।
अपेक्षा असेल प्राप्ती ।
करावी लागेल भक्ती ।
जन्मोजन्मी ।। २ ।।

आपल्या भोवती संत ।
परी नाही दिसत ।
दृष्टी नाही प्राप्त ।
आपल्याला ।। ३ ।।

संत संगति शिवाय ।
दुसरा नाही उपाय ।
नाही तर अपाय ।
जीवनात ।। ४ ।।

सिद्धदास, सोलापूर
९/०२/२०२२

# यशवंत धाराशिव जिल्हा

बुधवार दि. ०२ ऑक्टोबर २०२४

३

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane@gmail.com


## श्री क्षेत्र नारायण गड दसरा मेळावा जनजागृती बैठक



धाराशिव दि.१ (प्रतिनिधी) – बीड जिल्ह्यातील श्री क्षेत्र नारायण गड येथे मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत दि.१३ ऑक्टोबर दसरा मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्या संदर्भात नियोजन करण्यासाठी धाराशिव तालुक्यातील आळणी व कुमाळवाडी येथे दि.३० सप्टेंबर रोजी बैठक घेण्यात आली.
धाराशिव जिल्ह्यात श्री क्षेत्र नारायण गड मेळाव्यासाठी जाण्यासाठी कसे नियोजन करता येईल ? याबाबत जनजागृती करण्यावर भर देण्यात येणार आहे. तसेच जरांगे पाटलांची भूमिका व श्री क्षेत्र नारायण गड येथे दसरा मेळाव्यासाठी येणे का गरजेचे आहे ? तसेच सर्वच राजकीय नेते मंडळी कशी बोटचेपी भूमिका घेतात ? मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यासाठी कोणीही पत्र देत नाहीत याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली.

# मला लोकप्रतिनिधित्वाची संधी द्या जिल्ह्यातील सहकाराचे पुनर्जिवन करणारच – ॲड. गुंड

## ऊस पीक परिसंवाद व शेतकरी मेळाव्यास प्रतिसाद




धाराशिव दि.१ (प्रतिनिधी) – जिल्ह्यातील सहकार क्षेत्र प्रस्थापितांनी उध्वस्त केले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील तरुण उदरनिर्वाह करण्यासाठी पुणे, मुंबई व इतर ठिकाणी स्थलांतर करीत आहेत. विशेष म्हणजे प्रस्थापितांनी स्वतः व फक्त त्यांच्याच नातेवाईकांच्या माध्यमातून सहकार क्षेत्राचा स्वाहाकार करण्याचे काम केले आहे. तर रूपामाता उद्योग समूहाच्या माध्यमातून हजारो तरुणांच्या हाताला रोजगार व शेतकऱ्यांच्या मालाला भाव देण्याची महत्त्वपूर्ण भूमिका निभावली व निभावत आहे. त्यामुळे मला तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रतिनिधित्व करण्याची संधी दिली तर जिल्ह्यातील सर्व सहकार क्षेत्र पुनर्जीवित करणार असल्याची ठाम ग्वाही रूपामाता उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष ड व्यंकटराव गुंड यांनी दि.१ ऑक्टोबर रोजी दिली.
धाराशिव तालुक्यातील चिखली पाटी येथील सभागृहात रूपामाता नॅचरल शुगर युनिट क्रमांक १ च्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या ऊस पीक परिसंवाद व भव्य शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकरराव गुंड गुरुजी तर प्रमुख पाहुणे म्हणून पुणे येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे मृदा शास्त्रज्ञ डॉ समाधान सुरवसे, प्रगतशील शेतकरी सत्यवान सुरवसे, रांजणी येथील एन.साई कारखान्याचे संचालक तथा कृषिभूषण पांडुरंग आवाड, हभप बाबुराव पुजारी, मधुकरराव तावडे, दत्ता सोनटक्के, संजय दळवे, बालाजी भोसले, पिरसाब शेख, लिंबराज साळुंके, महादेव साळुंके, रामदास गुंड, विनोद बाकले, व्यंकट शिंदे, पांडुरंग राजगुरु, व्यंकट मरगने गुरुजी आदी उपस्थित होते.
पुढे बोलताना ड गुंड म्हणाले की, धाराशिव जिल्ह्यातील जिल्हा सहकारी बँक, सहकारी सूतगिरणी, सहकारी जिल्हा दूध संघ व सहकारी साखर कारखाने आदी शेतकरी व सभासदांच्या मालकीचे राहीले नाहीत. तर ते उध्वस्त करून संपूर्ण सहकार क्षेत्र आतापर्यंतच्या प्रस्थापितांनी उध्वस्त केले. ही अवस्था जिल्ह्यातील प्रस्थापित पुढाऱ्यांनी केली असल्याचा घणाघात केला. उलट पश्चिम महाराष्ट्रातील गोकुळ दूध संघ हा शेतकऱ्यांच्या मालकीचा असून तो महाराष्ट्रातील सगळ्यात मोठा असल्याचे सांगत आपली अवस्था येथील प्रस्थापित पुढाऱ्यांनी केली असल्याचा घणाघाती आरोप जिल्ह्यातील आजपर्यंतच्या सत्ताधाऱ्यांवर केला. तसेच रूपामाता उद्योग समूहाच्या माध्यमातून चालविलेला सहकार नफ्यात चालतो. मात्र येथील प्रस्थापितांनी शेतकऱ्यांचा पुत्र म्हणून लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी सहकार उद्योग तोट्यात दाखवून नातेवाईकांच्या मदतीने सहकाराचा स्वाहाकार केल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. येथील युवकांना हाताला काम नसल्यामुळे ते उदरनिर्वाह करण्यासाठी पुणे, मुंबई व इतर ठिकाणी स्थलांतर करीत असून ही दुर्दैवी वेळ त्यांच्यावर प्रस्थापितांनी आणली असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच रूपामाता बँक, साखर कारखाना, दूध डेअरी या माध्यमातून शेतकऱ्यांना जोडधंदा त्यांच्या ऊसाला योग्य भाव व हजारो तरुणांच्या हाताला रोजगार मिळवून देण्याचे शाश्वत काम केले आहे. विशेष म्हणजे शेतकऱ्यांना ऊस गाळपासाठी मोठ्या प्रमाणात संकटाचा सामना करावा लागत होता. मात्र रूपामाता कारखान्याच्या माध्यमातून कारखानदारीची मक्तेदारी मोडून काढण्याचे काम रुपामाता समुहाने केले असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे मला लोकप्रतिनिधी म्हणून संधी दिली तर या भागातील शेतकरी, सामान्य व गोरगरिबांना नक्की न्याय देईन. तसेच जिल्ह्यातील सर्व सहकार क्षेत्र पुन्हा पुनर्जीवित केल्याशिवाय राहणार नसल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी समाधान डॉ सुरवसे म्हणाले की, ऊस शेतीसाठी निचरा होणारी व सुपीक जमीन असणे अत्यंत आवश्यक असते. जेवढा सेंद्रिय खत जास्त तेवढी सुपीकता जास्त तयार होत असल्यामुळे उत्पादन देखील चांगल्या प्रकारे होण्यास मदत होते. तसेच जमिनीतील सेंद्रिय कर्ब जेवढा जास्त असेल तेवढी रासायनिक खते पचविण्याची शक्ती जास्त तयार होत असते असे सांगत शेतकऱ्यांनी पाचट जाळण्याऐवजी ते तसेच कुजवावे असे आवाहन त्यांनी केले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे जमिनीस कोणते घटक आवश्यक आहेत ? हे जाणून घेण्यासाठी माती परीक्षण करणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे (एनपीके) नत्र, स्फुरद व पालाश याचे योग्य प्रमाण देता येतात. विशेष म्हणजे रासायनिक खतांमध्ये सेंद्रियखतांचे मिश्रण केल्यास दिलेले घटक विकास लागू होऊन एकरी १०० टन उसाचे उत्पादन मिळाल्याशिवाय राहणार नसल्याचे त्यांनी सांगितले. तर पांडुरंग आवाड म्हणाले की, शेतकऱ्यांनी उसाच्या सरीमध्ये ५ फूटाचे ठेवणे आवश्यक आहे. तसेच एका चौरस फूटामध्ये फक्त एकच ऊस जिवंत राहत असल्याने कारखान्यापर्यंत एकरी फक्त ४० हजार ऊस जात असल्याचे त्यांनी सांगितले. त्यासाठी पाणी, रोग कीड, जमिनीची सुपीकता, लागवड व बियाणे याचे व्यवस्थापन करणे महत्त्वाचे असून ऑक्टोबरमध्ये उसाची लागण केल्यास उगवण शक्ती चांगली होते. शास्त्रानुसार ऊस हे सूर्यप्रकाशावर येणारे पीक असून जेवढा सूर्यप्रकाश उसाच्या पानावर असेल तेवढे उसामध्ये साखरेचे प्रमाण जास्त तयार होत असल्याचे त्यांनी नमूद केले. विशेष म्हणजे उसाची लागवड करताना दोन डोळ्यांमधील अंतर हे नऊ (९) इंच ठेवावे. उसाचे पाचट तसेच ठेवल्यास पावसाळ्यामध्ये गांडूळ मोठ्या प्रमाणात तयार होऊन जमीन आपोआप नैसर्गिकरित्या भुसभुशीत तर होतेच. शिवाय खुरपणीचा खर्च टळण्यासह जमिनीला एअर कंडिशन करण्याचे काम या पाचटाच्या माध्यमातून होत आहे. तसेच त्यापासून चार ते साडेचार टन सेंद्रिय खत आपोआप तयार होत असल्यामुळे भविष्यामध्ये एकाही शेतकऱ्यांने उसाचे पाचट जाळू नये, असे आवाहन त्यांनी केले. तसेच सत्यवान सूर्यवंशी यांनी वयामानानुसार पिकाला पाणी व खते दिली पाहिजेत असे आवाहन करून पाण्याचे नियोजन करावे असे आवाहन त्यांनी केले. मजुरीचा प्रश्न मिटवायचा असेल तर स्वतः शेतकऱ्यांनी काम करण्याबरोबरच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी राष्ट्रीय शिवशाहीर बंडू खराटे यांनी पोवाडा सादरीकरण करून ड व्यंकटराव गुंड यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या विकास पर्वाची महती उपस्थितांना आपल्या शाहिरी व पहाडी आवाजात ऐकवली. प्रारंभी तुळजाभवानी माता व रुपामाता यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकरराव गुंड गुरुजी यांनी तर सूत्रसंचालन दौलत निपाणीकर यांनी व उपस्थितांचे आभार गजानन पाटील यांनी मानले. यावेळी ऊस उत्पादक, शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. घाटूळे यांचा दुधगावकर यांच्या हस्ते सत्कार



धाराशिव दि.१ (प्रतिनिधी) – कळंब तालुक्यातील घारगाव येथील सेवानिवृत्त शिक्षक अरविंद नानाभाऊ घाटूळे यांचे पुत्र डॉ. महेश अरविंद घाटूळे यांची २०२३ च्या राज्यसेवा परिक्षेमध्ये राज्यात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होऊन वर्ग– १ पदी निवड झाली. त्याबद्दल डॉ.महेश घाटूळे, आई, वडील व बहीण यांचा घारगाव येथे त्यांच्या घरी जाऊन राष्ट्रवादी शरदचंद्र पवार काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष संजय पाटील दुधगांवकर यांनी सत्कार केला. यावेळी आई मीरा अरविंद घाटूळे, बहीण मंजुषा बबन मुसळे, अनुरथ साळुंके, वसंत कुंभकर्ण, युवराज साळुंके, नाना साळूंके, अबरार काझी, अनिल नवगन, भैय्या साळुंके, रफिक पठाण, कलाम पठाण आदी उपस्थित होते.

## अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाची तालुका कार्यकारिणी जाहीर



धाराशिव दि.१ (प्रतिनिधी) – शिक्षक संघाच्या धाराशिव तालुकाध्यक्षपदी नागनाथ मुडबे यांची तर सरचिटणीसपदी बालाजी निंबाळकर यांची निवड करण्यात आली आहे.
अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघाची बैठक धाराशिव येथील कन्या प्रशालेत राज्य उपाध्यक्ष लालासाहेब मगर, राज्य कार्यकारिणी सदस्य बशीर तांबोळी व सविताताई पांढरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. या बैठकीत धाराशिव तालुका नेते म्हणून सुरेश भालेराव यांची व कार्याध्यक्ष म्हणून सुधीर पवार यांची तर नागनाथ मुडबे, कोषाध्यक्ष म्हणून पवण क्षिरसागर यांची तसेच उपाध्यक्ष म्हणून लक्ष्मण घोडके व धम्मदीप सवई यांची तर संघटक म्हणून नितीन सलगरे यांची तसेच जिल्हा उपाध्यक्ष म्हणून मालोजी वाघमारे यांची तर जिल्हा सहसचिव म्हणून राजेंद्र आकोसकर यांची व जिल्हा चिटणीस म्हणून संतोष डोके यांची तर जिल्हा संघटक दिपक ठोंबरे यांची व जिल्हा संपर्कप्रमुख बाळासाहेब कांबळे यांची तसेच जिल्हा प्रसिद्धी प्रमुख प्रवीण गाडे यांची निवड करण्यात आली आहे.
या बैठकीस जिल्हाध्यक्ष बाळासाहेब वाघमारे, जिल्हा सरचिटणीस अविनाश मोकाशे, महेबूब काझी, बाळकृष्ण पाटील, नवनाथ चौरे, सतीश ढोणे, शिवाजी साखरे, संजय गाडेकर, दयानंद जेटीथोर, महेंद्र रणदिवे, मिलिंद जानराव, विलास ताकपिरे, बाळासाहेब माने, सुधीर गायकवाड, श्रीहरी बिडवे, लहू जगताप, करडखेले, मारूती काळे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

## प्रयागबाई जाधव यांचे निधन



धाराशिव दि.१ (प्रतिनिधी) – तालुक्यातील चिलवडी येथील हैद्राबाद मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्य सैनिक शिवाजी रामचंद्र जाधव यांच्या पत्नी प्रयागबाई शिवाजी जाधव (७६ वर्षे) यांचे दि.२९ सप्टेंबर रात्री १०.३० वाजण्याच्या अल्पशा आजाराने धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती स्वातंत्र्यसैनिक शिवाजी जाधव, मुलगा व साखर कामगार नेते नंदकुमार जाधव यांच्या मातोश्री, एक मुलगी, सुन, नातू व नातसून असा परिवार आहे.

## वकील नागरी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा पडली पार




धाराशिव दि.१ (प्रतिनिधी) – येथील वकील नागरी पत संस्थेची २२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा धाराशिव शहरातील शिवानंद फंक्शन हॉलमध्ये खेळीमेळीच्या वातावरणात दि.३० सप्टेंबर रोजी पार पडली.
सभेच्या अध्यक्षस्थानी जिल्हा विधीज्ञ बार अध्यक्ष ड प्रसाद जोशी यांनी भूषविले वकील नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष ड राजेंद्र धाराशिवकर यांनी अहवाल सादर करून धाराशिव, उमरगा व भूम या शाखेंचा लेखाजोखा मांडला. संस्थेने यावर्षी ५५ कोटीची उलाढाल केली असून ९ कोटीच्या ठेवी आहेत. सभासदांना विविध गरजा भागविण्यासाठी कर्ज वाटप केले आहे संस्थेला ऑडिट वर्ग ए मिळाला असून संस्थेला यावर्षी १७ लाख नफा झाला असल्याचे अध्यक्ष व संचालक मंडळाने यावर्षी १२ टक्के लाभांश देण्याचे ठरविले असून त्याला सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली. यावेळी संस्थेचे संचालक ॲड. रामचंद्र गरड, ॲड. पंडित नळेगावकर, ॲड. रमेश वट्टे, ॲड, एस.के. बिराजदार, कार्यकारी संचालक माधुरी जाधव, वकील व सभासद उपस्थित होते. सहकार प्रशिक्षक अधिकारी मधुकर जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

## प्रा. हाके यांच्यासह ओबीसी नेत्यांना सरंक्षण देण्यात यावे



धाराशिव दि.१ (प्रतिनिधी) – पुणे शहरात ओबसी नेते प्रा. लक्ष्मण हाके यांना जीवे मारण्याचा प्रयत्न दि.३० सप्टेंबर रोजी करण्यासह त्यांच्यासोबत गैरवर्तणूक देखील करण्यात आली. असाच प्रयत्न पुन्हा केला जाऊ शकतो. त्यामुळे ओबीसी नेते प्रा.लक्ष्मण हाके यांच्यासह सर्व ओबीसी नेत्यांना संरक्षण देण्यात यावे अशी मागणी ओबीसी नेत्या डॉ स्नेहा सोनकाटे यांनी एका निवेदनाद्वारे पोलीस अधीक्षकांकडे दि.१ ऑक्टोबर रोजी केली आहे.
दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, ओबीसी आरक्षण बचाव आंदोलन निर्णायक टप्प्यावर आहे. ओबीसी, भटक्या व विमुक्त अशा ४०० जातींचा पाठिंबा या आंदोलनाला आहे. अशात हे आंदोलन दडपण्यासाठी असे प्रयत्न सुरु आहेत. त्यासाठी झुंडशाहीचा वापर केला जात असून आज घडीला झुंडशाही विरुद्ध लोकशाही असा संघर्ष सुरु आहे. आंदोलन करणे, आपली बाजू मांडणे व संविधानिक प्रक्रियेत राहून न्याय हक्क मिळवणे हा अधिकार नागरिकांना संविधानातून मिळालेला आहे. त्यामुळे देशात संविधान व कायद्यापेक्षा कुणीही मोठे नाही. मात्र, राजकीय वरदहस्त असलेले कार्यकर्ते असा टोकाचा संघर्ष करुन महाराष्ट्राचे वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न करत असल्याचे नमूद केले आहे. तसेच प्रा हाके हे ओबीसी आरक्षण बचाव आंदोलनाचे नेतृत्त्व असून त्यांचे खच्चीकरण करुन चळवळ संपवण्याचे प्रयत्न सुरु आहेत. ते आम्ही कधीही खपवून घेणार नाहीत. लोकशाहीचे रक्षक म्हणून या आंदोलनाला, उपेक्षित व वंचित समाजाच्या अभिव्यक्तीला संरक्षण देणे तुमचे कर्तव्य आहे. त्यामुळे प्रा. हाके यांच्यासह ओबीसी नेत्यांना संरक्षण देण्यात यावे, अशी मागणी केली आहे. या निवेदनावर ओबीसी नेत्या डॉ.स्नेहा सोनकाटे, हरिदास शिंदे, मिलिंद चांदणे, रवी कोरे, राजाभाऊ माळी, अरुण डोलारे, सरफराज पटेल यांच्या सह्या आहेत.

## भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या त्रैमासिक बैठकीचे आयोजन – जाधव

धाराशिव दि.१ (प्रतिनिधी) – जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीची जुलै–२०२४ ते सप्टेंबर–२०२४ कालावधीमधील त्रैमासिक बैठकीचे आयोजन दि. ७ ऑक्टोंबर रोजी करण्यात आले असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी शोभा जाधव यांनी दिली.
जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीत नागरिकांच्या तक्रारी किंवा अभिकथने पुराव्यासह सादर करावयाची असल्यास तक्रारी किंवा अभिकथनाशी संबंधित अधिकारी ज्या तालुक्यात कार्यरत आहे. त्या तालुक्यातील भ्रष्टाचार निर्मुलन समितीकडे किंवा संबंधित विभागाच्या जिल्हा दक्षता समितीकडे अथवा जर संबंधित विभागाने, तालुकास्तरीय समितीने कार्यवाही केली नसल्यास जिल्हास्तरीय भ्रष्ट्राचार निवारण समितीकडे सादर करता येईल. सर्व कार्यालय प्रमुख, अशासकीय सदस्य व सर्व जनतेने याची नोंद घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा भ्रष्टाचार निर्मुलन समितीच्या सदस्य सचिव शोभा जाधव यांनी केले आहे. जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे अर्ज सादर करण्यासाठी कार्यपध्दती निश्चित केली आहे. जिल्हयातील प्रत्येक प्रशासकीय विभागाने जिल्हा हा घटक समजून जिल्हयातील वरिष्ठतम अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा दक्षता समिती गठीत करण्यात आली आहे. प्रथमतः तक्रारदाराने तक्रार गठीत समितीकडे दाखल करावी. माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती अथवा इतर स्त्रोताव्दारे शासकीय अधिकाऱ्या विरुध्द भ्रष्टाचार गैरव्यवहार व अफरातफर केल्याचे पुरावे हे, संबंधित अधिकारी ज्या तालुक्यात कार्यरत आहे. त्या तालुक्यातील भ्रष्टाचार निर्मुलन समितीकडे किंवा संबंधित विभागाच्या जिल्हा दक्षता समितीकडे तक्रारदारास तक्रार सादर करता येईल. भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे प्राप्त झालेल्या तक्रारी सोबतच्या पुराव्यांमध्ये तथ्य आढळल्यास ३० दिवसांच्या आत तक्रारी पुराव्यासह तपासून तो ज्या कार्यालयामध्ये कार्यरत आहे. त्या कार्यालयाच्या परिच्छेद ८ नुसार गठीत केलेल्या जिल्हा दक्षता समितीकडे पाठविण्यात यावी. उपरोक्त अ व ब नुसार प्राप्त झालेल्या तक्रारीच्या संदभांत उपरोक्त परिच्छेद ८ नुसार गठीत करण्यात आलेल्या जिल्हा दक्षता समितीने ९० दिवसात निर्णय घ्यावा. त्यामध्ये जर संबंधित अधिकारी, कर्मचारी सकृतदर्शनी दोषी दिसत असेल तर त्याबाबत शिस्तभंगविषयक प्राधिका–यांना आपला अहवाल सादर करील. जिल्हास्तरीय दक्षता समितीकडे पाठविण्यात आलेल्या तक्रारीवर ९० दिवसांच्या कालावधीत निर्णय घेण्याची कारवाई झाली नाही तर तक्रारदारास त्याची तक्रार जिल्हा भ्रष्टाचार निर्मुलन समितीकडे पुराव्यासह सादर करता येईल. तसेच जिल्हा भ्रष्टाचार निर्मुलन समितीकडे अर्ज सादर करताना तक्रारदाराने तालुका भ्रष्टाचार निर्मुलन समितीकडे किंवा संबंधित विभागाच्या जिल्हा दक्षता समितीकडे सादर केलेल्या तक्रारी अर्जाची छायाप्रत व पुरावे तक्रारी अर्जासोबत सादर करणे आवश्यक असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी जाधव यांनी सांगितले आहे.



## डॉ ओंबासे यांच्या हस्ते डॉ घाटूळे यांचा सत्कार

धाराशिव दि.१ (प्रतिनिधी) – कळंब तालुक्यातील घारगाव येथील डॉ.महेंद्र घाटूळे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सन २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या राज्यसेवेच्या परीक्षेत उपजिल्हाधिकारीपदी निवड झाल्याबद्दल जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांनी त्यांच्या कक्षात डॉ.महेंद्र घाटुळे यांचा गुलाब पुष्प व पुस्तक भेट देऊन दि.१ ऑक्टोबर रोजी सत्कार केला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव, डॉ.महेश यांची आई, वडील व बहीण उपस्थित होते.

## तुळजापूर परिसरात तीन दिवस दारूबंदी

धाराशिव दि.१ (प्रतिनिधी) – तुळजापूर येथे ३ ते १८ ऑक्टोबर या कालावधीत श्री तुळजाभवानी शारदीय नवरात्र महोत्सव साजरा होत आहे. या कालावधीत तुळजापूर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांनी महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ मधील कलम क्र.१४२ (१) अन्वये नियमाचा वापर करुन ३ ऑक्टोबर रोजी घट स्थापनेच्या दिवशी दि.१२ ऑक्टोबर रोजी होमावर धार्मिक विधीच्या दिवशी व १६ ऑक्टोबर रोजी कोजागिरी पोर्णिमेच्या दिवशी तुळजापूर नगर परिषद हद्दीतील सर्व प्रकारची किरकोळ देशी व विदेशी मद्य विक्रीची परवाना असलेली दुकाने बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

# संपादकीय

## जम्मूत काँग्रेस खिंडीत

जम्मू-काश्मीरमध्ये प्रचारासाठी काँग्रेस निवडक चेहेर्यांवर अवलंबून राहिला आहे. पक्षाचे व मित्र पक्षांचे नेते आणण्यात पक्षाला यश का आले नाही? विशेषत: जम्मू भागात त्यांचा प्रचार कमकुवत दिसत आहे.

जम्मू-काश्मीर विधानसभेच्या निवडणुकीचा तिसरा आणि शेवटचा टप्पा उद्या पार पडत आहे. या टप्प्यात ४० मतदारसंघांत मतदान होत आहे. आतापर्यंत दोन टप्प्यांत राज्यात शांततेत मतदान पार पडले आहे. तिसऱ्या टप्प्यातही हाच कल राहण्याची शक्यता आहे. शांत वातावरणापेक्षाही कोणत्या पक्षाकडे किंवा आघाडीकडे मतदारांचा कल आहे हे जास्त महत्त्वाचे आहे. केंद्रातील सत्तारूढ भारतीय जनता पक्षाला कडवे आव्हान उभे करण्याचा 'इंडिया' आघाडीचा प्रयत्न आहे. राज्यात या आघाडीत काँग्रेस व नॅशनल कॉन्फरन्स हेच प्रमुख पक्ष आहेत. मेहबूबा मुफ्ती यांचा 'पीडीपी' हा पक्ष आघाडीत नसला तरी भाजपला विरोध करण्यासाठी 'इंडिया'च्या बाजूने आल्याचे ते सांगत आहेत. त्याचा 'इंडिया'ला फायदा जास्त होतो, की भाजपला ते निकालानंतर कळेलच; मात्र नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेस यांचेही सख्य कितपत कायम आहे याचीही शंका आहे. पहिल्या दोन्ही टप्प्यांतील प्रचारात या पक्षांचे वरिष्ठ नेते क्वचितच एकत्र दिसले. बंडाळीने दोन्ही पक्षांना ग्रासले आहे हा भाग आणखी वेगळा. शेवटच्या टप्प्यात जम्मू भागातील मतदार संघ जास्त आहेत. तेथे 'इंडिया' आघाडीची कसोटी लागणार आहे. काँग्रेसच्या नेत्यांच्या सभा रद्द झाल्या आहेत, तर पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रचारासाठी मैदानात उतरले आहेत.

कागदावर ऐक्य?

जम्मू-काश्मीरची निवडणूक एकत्र लढवण्याचे नॅशनल कॉन्फरन्स व काँग्रेसने ठरवले. त्याचे कारण दोघेही स्वतंत्रपणे राज्यात काहीच करू शकत नाहीत. एकूण ९० पैकी नॅशनल कॉन्फरन्सकडे ५१ व काँग्रेसकडे ३२ जागा आल्या आहेत. पाच मतदार संघांत या दोन्ही पक्षांत मैत्रीपूर्ण लढती' होत आहेत. त्यामुळे जागा वाटपाचा करार कितपत विश्वासार्ह मानावा असा संभ्रम मतदारांत निर्माण झाल्यास ते चुकीचे ठरणार नाही. नॅशनल कॉन्फरन्सकडे काश्मीर खोर्यातील जागा जास्त आहेत, तर काँग्रेसकडे जम्मूमधील जास्त जागा आल्या आहेत. विशेष राज्याचा दर्जा देणारे ३७० वे कलम रद्द केल्यानंतर प्रथमच विधानसभा निवडणूक होत असल्याने उमेदवारी मागणाऱ्यांची संख्या सर्वच पक्षांत जास्त आहे. नॅशनल कॉन्फरन्स व काँग्रेसमध्ये त्यामुळेच बंडाळी झाली; पण ती सीमित ठेवण्यात आतापर्यंत तरी दोघांना यश आले आहे. नव्या सरकारकडे स्पष्ट बहुमत असावे व जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा मिळावा, यावर दोन्ही पक्षांत एकमत आहे. ३७०वे कलम पुन्हा लागू करावे अशी नॅशनल कॉन्फरन्सची मागणी आहे, त्यावर काँग्रेस मौन बाळगून आहे. अखेरच्या टप्प्याला जेमतेम आठवडा उरला होता, तरीही जम्मू भागातील प्रचारात 'इंडिया'चा जोर दिसला नव्हता. त्यामुळे उमर अब्दुल्ला यांनी चिंताही व्यक्त केली होती. लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांच्या गेल्या शुक्रवारी जम्मू भागात दोन सभा होणार होत्या; मात्र खराब हवामानामुळे दिल्लीहून विमानाचे उड्डाण न झाल्याने ते जम्मूला पोहोचू शकले नाहीत. हे वास्तव असले तरी आघाडीला या भागात प्रचारात रस नसल्याची भावना पसरू शकते. अन्य राज्यांतील नेतेही जम्मू-काश्मीरमध्ये आणण्यात काँग्रेस कमी पडला आहे. आपल्या पक्षाने काँग्रेसला जम्मूत जास्त जागा दिल्या; पण त्या भागात त्यांनी जी कामगिरी करणे अपेक्षित होते तशी झालेली नाही, अशी खंत उमर यांनी बोलूनही दाखवली. शेवटच्या टप्प्यात ज्या ४० मतदार संघात मतदान होत आहे. त्यापैकी २४ मतदार संघ जम्मू, उधमपूर, सांबा व कथुआ या जिल्ह्यात आहेत. येथे काँग्रेस २१ जागा लढवत आहे. सरकार स्थापनेची किल्ली या चार जिल्ह्यांकडे असल्याचे मानले जाते. भाजपनेही जम्मू भागावरच जास्त लक्ष केंद्रित केले आहे. मोदी, गृहमंत्री अमित शहा, पक्षाध्यक्ष जेपी नड्डा यांच्यासह अनेक नेत्यांच्या सभा, मेळावे आयोजित करून पक्षाने प्रचाराचा धुरळा उडवला आहे. त्या तुलनेत काँग्रेसचा प्रचार कमकुवत दिसत आहे. बंडखोर, पीडीपी व अन्य छोटे पक्ष किती मते मिळवतात यावरही काँग्रेसच्या यशाचे गणित अवलंबून आहे. सध्या तरी जम्मूत काँग्रेस अडचणीत असल्याचे दिसत आहे.

# जम्मू काश्मीरमध्ये लोकशाही रुजल्याचे संकेत



अटलबिहारी वाजपेयी यांनी जम्मू-काश्मीरसाठी जम्मूरियत, काश्मिरीयत आणि इन्सानियतची त्रिसूत्री दिली होती. तब्बल दहा वर्षांनंतर जम्मू-काश्मीरमध्ये झालेल्या पहिल्या दोन टप्प्यातील निवडणुकीत जम्मूरियत प्रत्ययाला आली. सत्ता मिळवण्यासाठी शह-काटशह, व्यूहनीती झाली असली, तरी काश्मीरमध्ये लोकशाही रुजली, रुळली असल्याचे जगाला दाखवून देण्यात भारत यशस्वी झाला आहे.

काश्मीरमध्ये दहा वर्षांपूर्वी पीडीपी' आणि भाजपचे सरकार सत्तेवर आले होते. भाजपने पीडीपी'चा पाठिंबा काढून घेतल्यानंतर ते सरकार कोसळले. नंतर काश्मीरचा विशेष राज्याचा दर्जा काढून घेण्यात आला. या काळात फक्त लोकसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या; परंतु जम्मू-काश्मीरमध्ये दहा वर्षांनंतर प्रथमच विधानसभेच्या निवडणुका झाल्या. दहा वर्षांपूर्वी झालेल्या त्या निवडणुकांच्या तुलनेत पहिल्या दोन टप्प्यांमध्ये जास्त मतदान झाले. वयोवृद्ध, तरुणांनी रांगेत उभे राहून मतदानाचा हक्क बजावला.

जम्मू-काश्मीरचे दोन प्रांतात विभाजन झाल्यानंतरची ही पहिलीच निवडणूक. लडाख प्रांत केंद्रशासित करण्यात आला आहे. जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा नाही, तसेच दिल्लीसारखे अनेक अधिकार काढून घेण्यात आले असले, तरी राजकीय पक्ष आणि मतदारांमध्ये उत्साह कायम होता. पहिल्या दोन टप्प्यांमधील मतदानानंतर आता राजकीय अंदाज बांधायला सुरुवात झाली आहे. अटलबिहारी वाजपेयी यांच्या तीन सिद्धांतांपैकी एका सिद्धांतावर काश्मीरची वाटचाल सुरू आहे, हे या निमित्ताने सिद्ध झाले. काश्मीरमध्ये काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्स'ची युती आहे. पीडीपी', भाजप, पीपल्स कॉन्फरन्स' आदी पक्षही निवडणुकीच्या रिंगणात आहेत. गेल्या ३६ वर्षांपासून काश्मीरमधील मूळ गावापासून दूर वनवासात जगणारे विस्थापित काश्मिरी पंडित मातृभूमीत परतण्याचे स्वप्न पूर्ण होईल, या आशेने मतदान करत आहेत. आपली तरुण पिढी आपल्या मुळांशी जोडलेली राहावी, यासाठी पुनर्वसन व्हायला हवे अशी त्यांची अपेक्षा आहे. त्यामुळेच काश्मीरमध्ये उत्साहात मतदान प्रक्रिया पार पडत असून सरकार ही जबाबदारी पेलण्याकामी यशस्वी ठरले आहे.

भाजपची रणनीती

पनुन काश्मीर आणि इतर संघटनांनी केलेल्या मतदानावरच्या बहिष्काराच्या आवाहनाचा फारसा परिणाम काश्मीरमध्ये झालेला नाही. येथील ७० वर्षीय अवतार कृष्णा म्हणतात, काश्मीरमधील हक्काच्या मातृभूमीवर हक्क मिळावा हीच आमची मागणी आहे; ज्यासाठी आम्ही वर्षानुवर्षे सातत्याने मतदान करत आहोत. या मागणीकडे दुर्लक्ष होत राहणे निराशाजनक आहे.' दोन दशकांपूर्वी जाहीर केलेली वापसी आणि पुनर्वसनाबाबतची सरकारी धोरणे कधीही प्रभावीपणे राबवली गेली नाहीत. दरम्यान, प्रत्येक लहान-मोठी निवडणूक गांभीर्याने घेत आपली सर्व ताकद पणाला लावणारा भाजप निवडणूक जिंकण्याची सर्वात मोठी यंत्रणा कामाला लावतो. अशा परिस्थितीमध्ये भाजपने या विधानसभा निवडणुकीत पूर्ण यंत्रणा उतरवली नाही, अशी चर्चा आहे. खोर्यातील २८ जागा भाजपने सोडल्या. याबाबत आता तर्क लढवले जात आहेत. भाजप गंभीर नाही, की त्याची ही रणनीती असून खोर्यात काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्स'च्या विरोधातील मतविभागणी टाळून आपले इप्सित साध्य करण्याचा प्रयत्न आहे, हे लवकरच कळणार आहे.

जम्मू-काश्मीरकडे केंद्र सरकारचे विशेष लक्ष आहे. कलम ३७० हटवणे असो, जम्मू-काश्मीर राज्याची पुनर्रचना असो किंवा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर जम्मू-काश्मीरची प्रतिमा सुधारणे असो; मोदी सरकारने खूप मेहनत घेतली आहे; मात्र निवडणूक लढवण्याची वेळ आली, तेव्हा भाजपने ९० पैकी केवळ ६२ जागांवर उमेदवार उभे केले. खोर्यात कमी जागांवर निवडणूक लढवली. जम्मू विभागातील सर्व ४३ जागांवर भाजप निवडणूक लढवत असला, तरी खोर्यातील ४७ पैकी केवळ १९ जागांवरच निवडणूक लढवत आहे. खोर्यात २८ जागा रिकाम्या ठेवल्या आहेत. भाजपने काश्मीर खोर्यामध्ये उमेदवार न देण्याचे कारण काय? दोन मुद्दे तपासले असता या प्रश्नाचे उत्तर सापडते. पहिले म्हणजे भाजपचे राजकारण आणि दुसरे म्हणजे खोर्यातील लोकसंख्या. भाजप एका विशिष्ट धर्माचे राजकारण करत असतो, असा आरोप नेहमीच केला जातो, तर खोर्याची लोकसंख्या भाजपने तयार केलेल्या कथनापेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. एका आकडेवारीनुसार, काश्मीर खोर्यातील सुमारे ९७ टक्के लोकसंख्या मुस्लिम आहे. जम्मू आणि काश्मीर दोन प्रदेशांमध्ये विभागले गेले आहे. भाजपला काश्मीर खोर्यात मते मिळणे फार कठीण आहे, तर हिंदू, शीख आणि बौद्ध मिळून लोकसंख्या तीन टक्क्यांहून कमी आहे. अशा स्थितीत खोर्यात भाजपला मते मिळवणे अवघड आहे आणि हे पक्षाला चांगलेच ठाऊक आहे. त्यामुळेच नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीतही खोर्यातील तीन लोकसभा जागांपैकी एकाही जागेवर भाजपने उमेदवार उभा केला नाही.

केवळ जम्मूवर लक्ष-जम्मूमध्ये भाजपने लोकसभेच्या दोन्ही जागांवर उमेदवार उभे केले. विजयही नोंदवला. त्यामुळे भाजपचे संपूर्ण लक्ष केवळ जम्मूवर आहे. जम्मू-काश्मीरमध्ये सत्ता मिळवण्यासाठी कोणत्याही पक्षाला ४६ जागांची आवश्यकता आहे. त्यामुळे भाजपने जम्मूवर आपले लक्ष केंद्रित केले आहे, तर खोर्यातून भाजप अपक्ष आणि पीडीपी'-नॅशनल कॉन्फरन्स'च्या बंडखोरांचा पाठिंबा मिळवण्याची अपेक्षा आहे. अभियंता रशीद यांना भाजपची बी टीम' म्हटले जाते. फारुख अब्दुल्ला, मेहबुबा मुफ्ती हे वारंवार सांगत आहेत, की भाजप त्यांच्या बंडखोरांना प्रोत्साहन देत आहे आणि भाजपला पुढचा मुख्यमंत्री जम्मूचा आणि हिंदू असावा असे वाटते. अनंतनागमधील भाजपचे उमेदवार रफिक वानी यांनी इंजिनिअर रशीद, सज्जाद लोन, अल्ताफ बुखारी आणि गुलाम नबी आझाद यांसारख्या नेत्यांना स्वतःचे म्हणून घोषित केले होते. अब्दुल्ला आणि मेहबुबा हे दोघेही इंजिनिअर रशीदच्या जामिनावर नाराज आहेत, कारण त्यांना मिळणारी मते नॅशनल कॉन्फरन्स'-काँग्रेसची किंवा पीडीपी'ची असतील. विजय असो वा पराजय; पक्षाने उमेदवार उभे केल्यासच खोर्यात जनाधार वाढेल, अशी भाजपच्या जुन्या कार्यकर्त्यांची इच्छा होती. कलम ३७० हटवल्यानंतर आणि जम्मू-काश्मीरमधील परिस्थिती बदलल्यानंतर भाजपला आपल्या जागा वाढण्याची अपेक्षा आहे, पण ती फक्त जम्मू भागात आहे. त्यामुळे जम्मूमध्ये ४३ पैकी ३२-३५ जागा मिळाल्या, तरी भाजपचा खोर्यातील अपक्षांच्या मदतीने सरकार स्थापन करण्याचा प्रयत्न असेल.

फुटीरतावाद्यांना सहानुभूती

पहिल्या दोन टप्प्यांमधील मतदानाच्या टक्केवारीने जम्मू-काश्मीरमधील जनतेला या निवडणुकीत किती उत्सुकता आहे हे दिसून आले. तुरुंगातून सुटका होऊन जमात'शी युती केल्यामुळे अभियंता रशीद यांच्यावर भाजपचे प्रॉक्सी' समर्थक असल्याचा आरोप होत आहे. रशीद यांच्या पक्षाला निधी कुठून दिला जात आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. इंजिनिअर रशीद यांचा पक्ष आणि जमात-ए-इस्लामी' यांची युती ही प्रत्यक्षात काँग्रेस, नॅशनल कॉन्फरन्स' आणि पीडीपी' विरुद्धची आघाडी असून त्यांची व्होट बँक फोडण्याचा प्रयत्न असू शकतो. स्थापनेपासून पीडीपी' काश्मीरमध्ये फुटीरतावाद्यांच्या सहानुभूतीचे राजकारण करत आहे. रशीद आणि जमात'देखील त्याच स्वरात बोलतात. जमात-ए-इस्लामी' आणि रशीद यांचे विचार सारखेच आहेत.

जमात-ए-इस्लामी'चे नेते १९८७ पासून सातत्याने निवडणुकीवर बहिष्कार घालत होते; मात्र या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत जमात'च्या अनेक नेत्यांनी मतदान करून लोकांना आश्चर्याचा धक्का दिला. जमात-ए-इस्लामी' ही धार्मिक-राजकीय संघटना आहे. या संघटनेचा काश्मीरमधील सोपोर, कुलगाम, शोपियान आणि पुलवामा येथे चांगला दबदबा आहे. काश्मीरच्या मुद्द्यावर भारत, पाकिस्तान आणि काश्मीरमधील जनतेने एकमेकांशी चर्चा करून तोडगा काढावा, असे जमात'चे म्हणणे आहे. २०१९ मध्ये केंद्र सरकारने जमात-ए-इस्लामी'वर दहशतवादी निधी आणि देशविरोधी कारवायांमध्ये सहभागी असल्याच्या आरोपावरून पाच वर्षांसाठी बंदी घातली होती. गेल्या तीन वर्षांमध्ये सरकारने जमात'च्या अनेक मालमत्ता जप्त केल्या आहेत. या वर्षी फेब्रुवारीमध्ये पाच वर्षे पूर्ण झाल्यानंतर सरकारने जमात-ए-इस्लामी'वरील बंदी पुन्हा पाच वर्षांसाठी वाढवली. या काळात जमात'चे अनेक नेते आणि कार्यकर्ते नजरकैदेत आहेत.

विधानसभा निवडणुकीपूर्वी जमात'ने आपल्या संघटनेवरील बंदी उठवावी, या अटीवर सरकारकडे निवडणुकीत भाग घेण्याची इच्छा व्यक्त केली होती; मात्र सरकारने बंदी उठवली नाही. या निर्बंधामुळे जमात-ए-इस्लामी'ला थेट निवडणूक लढवता आली नाही. त्यामुळे पक्षाने अपक्ष उमेदवारांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. जमात'च्या नेत्यांचा दावा आहे, की २०१९ नंतर सरकारने त्यांच्या संघटनेवर आणि त्यांच्याशी संबंधित लोकांवर आपली पकड घट्ट केल्यामुळे पक्षाच्या समस्या वाढल्या. त्यामुळे ते लोकशाही पद्धतीने लढण्याचा प्रयत्न करत आहेत. वाद-विवाद, चर्चा काहीही असली, तरी या निवडणुकीच्या निमित्ताने लोकशाही प्रक्रियेला अप्रत्यक्ष बळकट करण्यासाठी सर्वांचा हातभार लागतो आहे, हे महत्त्वाचे.


**–आरिफ शेख**

# प्रेम स्वातंत्र्याची किंमत नव्हे! : ओशो

आम्हाला सर्व हवे आहे पण आम्हाला प्रेम स्वातंत्र्याच्या किमतीवर नकोय. आपल्याला दोन्ही कसे मिळू शकते? मला माझे स्वातंत्र्य हवे आहे. मी माझ्या प्रेयसीला स्वातंत्र्य देतो पण मला तिचे लक्ष ठेवण्याच्या रुपात दु:ख मिळते. प्रेयसीला स्वातंत्र्य देण्याचा तुमचा विचारच चुकीचा आहे. प्रेयसीला स्वातंत्र्य देणारे तुम्ही कोण आहात? तुम्ही प्रेम करू शकतात व तुमच्या प्रेमात स्वातंत्र्य आहे. ही गोष्ट दुसऱ्याला देण्यासारखी नाही. जर देण्यास आली तर तिच अडचण येईल जिचा तुम्ही सामना करत आहात. खरंतर तुम्ही स्वातंत्र्य देऊ इच्छित नाही. तुम्हाला वाटेल की, स्वातंत्र्य देण्यासारखी परिस्थितीच निर्माण होऊ नये पण तुम्ही अनेकदा मला प्रेम स्वातंत्र्य देते, हे सांगताना ऐकले असेल म्हणून स्वातंत्र्य देण्यासाठी स्वत:वर दबाव टाकतात कारण तुमचे प्रेम, प्रेम नसते.

तुम्हाला एका अवघड प्रश्नात अडकले आहात. जर तुम्ही स्वातंत्र्य दिले नसते तर तुम्हाला प्रेमावर संशय आला असता. जर तुम्ही इच्छा नसूनही स्वातंत्र्य दिले तर हजार प्रश्न निर्माण होतात. तुम्ही तुमच्या प्रेयसीसाठी पुरेसे नाहीत? की तिला दुसऱ्याची साथ हवी म्हणून तिला स्वातंत्र्य हवे आहे? यामुळे दु:ख होते व तुम्ही विचार करतात की, तुम्ही आपल्यापेक्षा कमी महत्व देतात.

तिला स्वातंत्र्य देऊन तुम्ही इतरास पहिले ठेवले व नंतर स्वत:ला. हे अंहकाराविरुद्ध आहे व यामुळे काही फायदा होणार नाही कारण तुम्ही जे स्वातंत्र्य दिले आहे त्यासाठी तुम्ही बदलणार. दुसरी गोष्ट म्हणजे जर तुमची प्रेयसी दुसऱ्यासोबत राहिली असेल तर तुम्हाला आपल्या प्रेयसीसोबत राहणे वेगळे वाटेल. यामुळे तुमच्या व तिच्यात अडथळा निर्माण होईल.



तिने दुसऱ्याची निवड केली आहे व तुम्हाला सोडून दिले आहे किंवा तिने तुमचा अपमान केला आहे.

व तुम्ही तिला खुप काही दिले आहे, तुम्ही उदार होत आहोत, तुम्ही तिला स्वातंत्र्य दिले आहे. तुम्हाला दुखावल्यासारखे जाणवत आहे म्हणून तुम्ही तिला कुठल्यातरी रुपात दुखवाल.

पण हे सर्व गैरसमजामुळे होते. मी हे म्हणालो नाही की, तुम्ही प्रेम करत असाल तर तुम्हाला स्वातंत्र्य द्यावे लागेल. नाही मी म्हणालो आहे की, प्रेम स्वातंत्र्य आहे. येथे प्रश्न देण्याचा नाही. जे जसे आहे त्याला तसेच राहू द्या. विनाकारण गुंतागूंत का वाढवायची? अगोदरच अनेक अडचणी आहेत.

जर तुमचे प्रेम त्या पातळीपर्यंत आले आहे की, स्वातंत्र्य तिचे अंग बनले आहे तेव्हा तुमच्या प्रेयसीला परवानगी घेण्याची गरजच राहणार नाही. जर मी तुमच्या जागी असतो व माझ्या प्रेयसीने परवागनी मागितली तर मला दु:ख झाले असते. याचा अर्थ तिला माझ्या प्रेमावर विश्वास नाही. माझे प्रेम स्वातंत्र्य आहे. मी तिच्यावर प्रेम केले आहे याचा अर्थ असा नव्हे की, मी सर्व मुभा दिली ज्यामुळे ती कुणासोबतही हसू शकेल, कुणासोबतही नृत्य करु शकेल, कुणावर प्रेम करु शकणार नाही कारण आपण कोण आहोत?

आपण कोण आहोत? हा मुळ प्रश्न आहे, जो सर्वांनी केला पाहिजे. आपण सर्व अनोळखी आहोत व या आधारावर आपण सांगू शकतो की, मी तुला स्वातंत्र्य देईल किंवा मी तुला स्वातंत्र्य देणार नाही. जर तु माझ्यावर प्रेम करत असेल तर दुसऱ्यावर प्रेम करू शकत नाही? या सर्व मूर्ख गोष्टी आहे पण या सर्व मानवावर सुरुवातीपासून हावी राहिल्या आहेत व आपण अजूनही असभ्य आहोत. प्रेम काय असते? हे आपणास अजूनही माहित नाही.

जर मी कुणावर प्रेम करत असेल तर मी त्या व्यक्तीप्रती कृतज्ञ असतो की तिने मला प्रेम करू दिले, तिने माझे प्रेम स्वीकारले. हेच पुरेसे आहे. मी तिच्यासाठी कैदखाना बनत नाही. तिने माझ्यावर प्रेम केले व बदल्यात मी तिच्या चहुबाजूस कैदखाना बनवत आहे? मी तिच्यावर प्रेम केले व बदल्यात ती माझ्या चहुबाजूस कैदखाना बनवत आहे? आम्ही एकमेकांना चांगला पुरस्कार देत आहोत.

जर मी कुणावर प्रेम करतो तेव्हा मी तिचा कृतज्ञ असतो व तिचे स्वातंत्र्य कायम असते. मी तिला स्वातंत्र्य दिले नाही. हा तिचा जन्मसिद्ध हक्क आहे व माझे प्रेम तिचा हक्क हिरावून घेऊ शकत नाही. तुमचे प्रेम असलेल्या व्यक्तीकडून तुम्ही तिचे स्वातंत्र्य हिरावून घेऊ शकता? मी तिला स्वातंत्र्य देतो असे सुद्धा तुम्ही म्हणू शकत नाही. तुम्ही कोण आहात? एक अनोळखी. तुम्ही दोघे योगायोगाने रस्त्यावर भेटले व तो महान आहे की, त्याने तुमचे प्रेम स्वीकारले. त्याच्याप्रती कृतज्ञ रहा व ज्याप्रमाणे जगू इच्छिता त्याप्रमाणे त्यास जगू द्या व तुम्हाला जसे जगायचे असेल तर जीवन जगा. तुमच्या जीवनशैलीत कुणी हस्तक्षेप करणार नाही. यास स्वातंत्र्य म्हणतात. तेव्हा प्रेम कमी तणावपूर्ण, कमी चिंताग्रस्त, कमी क्रुद्ध व जास्त प्रसन्न होण्यास मदतगार ठरेल. जगात नेमके याउलट होत आहे. प्रेम खुप दु:खदायी असते व असेही लोक आहेत जे अखेरीस कुणावरही प्रेम न चांगले असा निर्णय घेतात. ते आपल्या मनाचे दरवाजे बंद करतात. पण प्रेमासाठी दरवाजा बंद करण्याचा अर्थ वास्तविकतेकडे, अस्तित्वाकडे पाठ फिरवणे आहे म्हणून मी याचे समर्थन करणार नाही. मी म्हणेन की, प्रेमाचे संपूर्ण स्वरूप बदला.

# शिवनेरी महाविद्यालयाच्या स्वंयसेवकांनी केली ग्रामीण रुग्णालयाची स्वच्छता



शिरूर अनंतपाळ : युवक व क्रीडा मंत्रालय, नवी दिल्ली राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय कक्ष, मुंबई यांच्या निर्देशानुसार १७ सप्टेंबर ते २ आक्टोबर २०२४ हा पंधरवाडा यावर्षी मस्वच्छता ही सेवा म या अभियानाने राबविण्याचे सूचित करण्यात आले आहे. त्यानुसार महाविद्यालय परिसर, रेल्वे स्टेशन, बसस्थानक, धार्मिक स्थळे, पर्यटन स्थळे, ग्रामीण रुग्णालय अशा सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता करणे, प्लास्टिक निर्मूलन करणे या संबंधी कळविण्यात आले आहे. या मोहिमे अंतर्गत येथील शिवनेरी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग , ग्रीन क्लॅब , क्रिडा विभागाने १ ऑक्टोबर २०२४ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग व महाविद्यालयातील विविध विभागांनी महाविद्यालयाचा परिसरा बरोबर कृष्ण नगर व ग्रामीण रुग्णालयाचा परिसर स्वच्छे केला. या वेळी महाविधालयाचे प्राचार्य डॉ .अरुण धालगडे , राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. अमोल इंगळे , डॉ पांडूरंग मुठ्ठे, ग्रीन क्लबचे समन्वयक डॉ हणमंत वाघलगावे, क्रीडा विभाग प्रमुख प्रा . बालाजी हालसे , तालुका अधिकारी डॉ . नारायण देशमुख, वैद्यकीय अधिकारी डॉ बालाजी देवंगरे, डॉ . हमजा बाहरे, सिस्टर जगताप मॅडम सह तालुका आरोग्य विभागाचे कर्मचारी ,विठ्ठल सूर्यवंशी, अनंत जाधव, अविनाश डुकरे ,प्रमोद जाधव. आदि व . रासेयो चे स्वयं सेवक यांनी स्वच्छेता करण्यासाठी परिश्रम घेतले . यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

# येरोळ व परिसरात सोयाबीनचा उतारा घटला, शेतकऱ्यांना दर वाढण्याची आपेक्षा

**प्रशांत तांबोळकर**

शिरूरआनंतपाळ : तालुक्यातील येरोळ व परिसरात सोयाबीन काढणीला सुरुवात झाली असून काही शेतकऱ्यांना एकरी दोन ते तीन क्विंटल सोयाबीन होत आहे. अनेक शेतकऱ्यांचे स्वप्न भंगलं आहे. यलो मोझॅक, पापडी, खोडमाशी या रोगामुळे सोयाबीनचे पीक मुदतीपुर्वीच वाळत असून, किडीच्या हल्ल्याने ते पोखरले जात आहे. पाने पिवळी आणि काळीही पडत आहेत. विविध रोगाच्या प्रादुर्भावामुळे सोयाबीन शेंगांवर काळे ठिपके पडत असून, डाग पडत आहेत. शेंगा वेळेपूर्वीच वाळत असल्याने शेंगा भरण्याचे प्रमाण जवळपास थांबले असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. याचा सोयाबीनच्या उत्पादनावर परिणाम होणार



असल्याने शेतकरी संकटात सापडला आहे.

शेतकर्यांनी महागडं बी-बियाणे आणून काळ्या आईची ओटी भरली, पिकांवर महागड औषधी फवारणी, कोळपणी केली. पण शेवटच्या घटकेला सोयाबीन पिकावर 'यलो मोझॅकसह इतर बुरशीजन्य रोगाचे आक्रमण झालं अन् त्यातून पीक सावरता आले नाही. काही भागात राशी चालु असुन एकरी २ ते ३ तर अन्य ठिकाणी ३ ते साडे चार क्विंटल सोयाबीन झालं आहे. त्याला कमीत कमी भाव ४ हजार ५६० ते ४ हजार ६०० रुपये मिळत आहे. तर सरासरी भाव ४ हजार २०० रूपयांपर्यंत भेटत आहे. त्यात काढणीचा खर्च आहे, अशा परिस्थितीत काय करावे काहीच सुचत सूचत नाही अशा प्रतिक्रिया शेतकरी देत आहेत.

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय – दूरध्वनी – २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक – **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com




# धर्मवीर २ची दमदार सुरुवात, पहिल्या दिवशी कमावले इतके कोटी



'धर्मवीर-मुक्काम पोस्ट ठाणे' हा चित्रपट २०२२ साली प्रदर्शित झाला होता. शिवसेनेचे दिवंगत नेते व ठाणे जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांच्या आयुष्यावर आधारित या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला होता. त्यानंतर आता या चित्रपटाचा दुसरा भाग 'धर्मवीर २ – साहेबांच्या हिंदुत्वाची गोष्ट' नावाने प्रेक्षकांच्या भेटीला आला. शुक्रवारी (२८ सप्टेंबर रोजी) चित्रपट सिनेमागृहांमध्ये प्रदर्शित झाला.प्रवीण तरडे दिग्दर्शित 'धर्मवीर २' चित्रपटात आनंद दिघेंची भूमिका अभिनेता प्रसाद ओक आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भूमिका क्षितिश दातेने साकारली आहे. या चित्रपटाने पहिल्या दिवशी किती कमाई केली, याची आकडेवारी समोर आली आहे. चित्रपटाचे निर्माते मंगेश देसाई यांनी इन्स्टाग्रामवर पोस्ट करून यासंदर्भात माहिती दिली आहे.मंगेश देसाई यांनी चित्रपटाचे पोस्टर इन्स्टाग्रामवर शेअर केले आहे. या पोस्टरमध्ये पहिल्या दिवसाच्या कमाईची आकडेवारी देण्यात आली आहे. चित्रपटाने दमदार ओपनिंग केली आहे. पहिल्या दिवशी 'धर्मवीर २' ने पहिल्या दिवशी १.९२ कोटी रुपये कमावले. २०२४ मध्ये सर्वाधिक ओपनिंग करणारा हा मराठी चित्रपट आहे, असं देसाई यांनी शेअर केलेल्या पोस्टमध्ये पाहायला मिळतंय. ''पहिल्याच दिवशी नेट १.९२ कोटी कमवून धर्मवीर -२ सिनेमा ठरला या वर्षीचा सगळ्यांत जास्त कमाई करणारा पहिला मराठी चित्रपट !! संपूर्ण टीम आणि प्रेक्षकांचे मनापासून अभिनंदन!! धर्मवीर -२'' असे कॅप्शन त्यांनी या पोस्टला दिले आहे.

'धर्मवीर २' या चित्रपटाबद्दल बोलायचं झाल्यास तो ९ ऑगस्ट रोजी प्रदर्शित होणार होता, पण त्यावेळी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी अतिवृष्टी झाली होती. पूरपरिस्थितीमुळे या चित्रपटाचे प्रदर्शन पुढे ढकलण्यात आले होते. आता शुक्रवारी हा चित्रपट रिलीज झाला आहे आणि चित्रपटाने चांगली कमाई केली आहे.

# श्रद्धा कपूरच्या बॉडीगार्डने तिच्या चाहत्याबरोबर केली धक्काबुक्की, व्हिडिओ व्हायरल

मुंबई -'स्त्री २' अभिनेत्री श्रद्धा कपूरने नुकतीच भुवन बामच्या 'ताजा खबर सीझन २'च्या स्क्रिनिंगला हजेरी लावली. जिथे बॉडीगार्डनं तिच्या फॅनला धक्काबुक्की केली. हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून त्यावर आता नेटिझन्स आपल्या प्रतिक्रिया देत आहेत. सोशल मीडियावर श्रद्धाच्या बॉडीगार्डवर आता टीका केली जात आहे. व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये, श्रद्धा कपूर तिच्या कारमधून खाली उतरून रेड कार्पेटकडे जाताना दिसत आहे. यानंतर तिच्या भोवती गर्दी जमते. श्रद्धाचा एक चाहता फोटो काढण्यासाठी मोबाईल घेऊन तिच्याकडे जातो.

श्रद्धाच्या चाहत्याला बसला धक्का : यानंतर अचानक एक बाउन्सर त्याला ढकलून देतो. बाऊन्सर हा श्रद्धाला पुढे जाण्याचा मार्ग मोकळा करतो. हा सुरक्षा रक्षक खास श्रद्धासाठी होता की, तो कार्यक्रमाच्या सुरक्षा पथकाचा भाग होता हे अजूनही स्पष्ट झालेलं नाही. या पोस्टवर सोशल मीडिया यूजर्सकडून वेगवेगळ्या प्रतिक्रिया येत आहेत. काही लोकांनी बॉडीगार्डवर चाहत्याशी असभ्य वर्तन केल्याबद्दल टीका केली आहे. काहींनी असा युक्तिवाद केला की, चाहत्यांनी सेलिब्रिटींच्या वैयक्तिक आयुष्याचा विचार केला पाहिजे. त्यांच्याभोवती गर्दी करून त्यांना थांबवण्याचा प्रयत्न करू नये. सध्या श्रद्धाकडून कोणतीही विशेष प्रतिक्रिया आली नाही.

'स्त्री २' चित्रपटाबद्दल : यावेळी श्रद्धानं फक्त हात दाखवून बाऊन्सरला थांबवण्याचा प्रयत्न केला. यानंतर ती पुढं निघाली. श्रद्धा तिच्या 'स्त्री २' चित्रपटाच्या यशाचा आनंद घेत आहे. अमर कौशिक दिग्दर्शित या चित्रपटानं आतापर्यंतचा सर्वाधिक कमाई करणारा हिंदी चित्रपट बनून इतिहास रचला आहे. 'स्त्री २'नं शाहरुख खान स्टारर 'जवान'च्या कलेक्शनला मागे टाकले आहे. या चित्रपटात श्रद्धा कपूरसह राजकुमार राव, पंकज त्रिपाठी, अभिषेक बॅनर्जी आणि अपारशक्ती खुराना सारखे कलाकार आहेत. दरम्यान श्रद्धा 'स्त्री २'च्या यशाचा आनंद घेताना दिसत आहे. हा चित्रपट आता देखील बॉक्स ऑफिसवर नोटा छापत आहे. या चित्रपटामध्ये तिच्याबरोबर मुख्य भूमिकेत राजकुमार राव आणि पंकज त्रिपाठी दिसले आहेत.





# दूरसंचार कंपन्या आणि सरकारी कॉल

गेल्या आठवड्यात व्होडाफोन आयडिया कंपनी, कंपनीवर असलेले कर्ज आणि सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या कर वसुलीबाबतच्या निर्णयामुळे चर्चेत होती. एकूणच दूरसंचार क्षेत्रातील सर्वच कंपन्यांच्या शेअरमध्ये त्यामुळे हालचाल दिसून आली.

आज बहुतेक महानगरात घरटी किमान दोन दुचाकी आणि त्याच्या दुप्पट मोबाइल फोन आहेत. मोबाइल सेवा घेणारे ग्राहक सुमारे ११६ कोटी आहेत. लोकसंख्येच्या तुलनेत हे प्रमाण किती आहे हे लक्षात येईल. असे असले तरी सेवा देणाऱ्या कंपन्यांपैकी सर्व फायदा कमवणाऱ्या नाहीत. अर्थात याची कारणेही अनेक आहेत. सध्या सेवा देणाऱ्या व्होडाफोन-आयडिया, एअरटेल, बीएसएनएल, जिओ या चार प्रमुख कंपन्या आहेत. त्यातील बीएसएनएल सरकारी असल्याने तिची चर्चा माध्यमात फारशी होताना दिसत नाही. सर्वाधिक चर्चेतील कंपनी आहे व्होडाफोन; तीही तिच्यावर असलेल्या कर्जाच्या डोंगरामुळे. त्यात तिच्या भागभांडवलात केंद्र सरकारचा हिस्सा. बिर्ला समूह तिचे व्यवस्थापन पाहतो. उर्वरित कंपन्यात एक अंबानींची, दुसरी मित्तल समूहाची. याशिवाय दूरसंचार यंत्रणा उत्पादन क्षेत्रातही इंडस टॉवरसारखी कंपनी आहे.

गेल्या आठवड्यात व्होडाफोन आयडिया कंपनीवर असलेले कर्ज आणि सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या कर वसुलीबाबतच्या निर्णयामुळे चर्चेत होती. एकूणच दूरसंचार क्षेत्रातील सर्वच कंपन्यांच्या शेअरमध्ये त्यामुळे हालचाल दिसून आली. व्होडाफोनचा शेअर तर दर्शनी मूल्य म्हणजे दहा रुपयाच्या खाली घसरल्याचे दिसून आले.




या पार्श्वभूमीवर या क्षेत्रातील बलवान कंपन्या कोणत्या आणि क्षेत्राचे भवितव्य काय हे जाणून घेणे आवश्यक आहे. आज आपल्या प्रत्येकाच्या हातात असलेल्या मोबाइलवरून किराणा माल ते करमणूक अशी विविध कामे होतात. दोन तीन तीन महिने मोबाइल पेमेंट करणाऱ्या ग्राहकांना बँकेत जाण्याची गरजही भासत नाही. अशा वेळी सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल दूरगामी परिणाम करणारा ठरतो. सर्वोच्च न्यायालयाने ज्याबाबत निकाल दिला तो महसुलाचा आकडा एकट्या व्होडाफोनबाबत २,०९,५२० कोटी रुपये इतका आहे. एकूणच इतकी रक्कम देय असेल, तर संबंधित कंपनीचे आर्थिक कंबरडे मोडेल यात शंका नाही; मात्र दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांच्यासोबत दूरसंचार सेवा कंपन्यांच्या प्रतिनिधींची जी बैठक झाली तीत काही विधायक मार्ग निघेल अशी आशा आहे.

एकीकडे सरकार अधिकाधिक तंत्रस्नेही आणि वित्तीय साधने, तसेच सेवा मोबाइलवरच देण्याचे धोरण राबवत असल्याने या कंपन्या टिकणे गरजेचे आहे आणि त्याही फायद्यात राहायला हव्यात. केवळ कंपन्यांचे भागधारकच नाही, तर ग्राहकांचे हित महत्त्वाचे ठरते आहे. सध्या या कंपन्या एकीकडे नियामकांचा बडगा आणि दुसरीकडे स्पर्धा, नफा, ग्राहक टिकवणे अशा कात्रीत सापडलेल्या आहेत. या पार्श्वभूमीवर व्होडाफोन आयडिया (५२-ज्ञ हळसह १९.१८ ५२-ज्ञ श्रे ९.७९), एअरटेल (५२-ज्ञ हळसह सह १,७७९.०० ५२- ज्ञ श्रे ८९५.४५), जिओ (५२- ज्ञ हळसह सह ३९४.७० ५२-ज्ञ श्रे २०४.२५) या तिन्ही बाजारावर नोंदलेल्या कंपन्यांच्या शेअर भावात आगामी काळात वधघट झालेली दिसेल.

पाच लाख रुपयांपर्यंतच्या कर्जरोखे खरेदीसाठी यूपीआय प्रणाली

अनेकदा बाजारात कर्जरोखे विकून कंपन्या भांडवल उभारणी करतात. यात सरकारी आणि खासगी अशा दोन्ही स्वरूपाच्या कंपन्या आहेत. त्यातील बहुतेक बाजारावर नोंदले गेलेले आहेत. अद्यापही देशातील ही बाजारपेठ विकसित झालेली नाही; मात्र सरकार, नियामक यांच्याकडून त्याची व्याप्ती वाढावी यासाठी उपाय योजले जातात.

गेल्या आठवड्यात सेबीने त्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेतला. पाच लाख रुपयांपर्यंत ज्या गुंतवणूकदारांना रोखे खरेदी करायचे आहेत त्यांना ते यूपीआय देयक वापरून करता येणार आहेत. खरेदीसाठी लागणारी रक्कम खात्यातून वेगळी काढून ब्लॉक करण्यासाठी ही पद्धत वापरली जाईल. याने अर्ज प्रक्रिया सुलभ आणि पारदर्शक होईल असा अंदाज आहे. येत्या एक नोव्हेंबरपासून हा बदल अंमलात येणार आहे. तो करताना आधीच्या पद्धती सुरूच राहणार आहे. फक्त पब्लिक इश्यूसाठी ती अंमलात येईल. कर्जरोखे, अपरिवर्तनीय प्रेफरन्स शेअर, महापालिकांचे बॉन्ड यांच्यासाठी ती सध्या अंमलात आहे.

**-भाग्यश्री पटवर्धन**

# अजित दादांची कोंडी ?

अजित पवार यांची अलीकडची काही विधाने त्यांची मानसिकता बदलत असल्याचीच साक्ष देतात. शरद पवार यांच्यावर थेट टीका करण्याचे ते टाळतात, सुप्रिया सुळे यांच्या विरोधात पत्नीला निवडणूक लढवायला लावली ही चूक झाल्याची कबुलीही देतात. महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक जवळ येत आहे, तसतसा राज्यातील राजकारणाला रंग चढत आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये जागावाटपाची खलबते सुरू झाली आहेत. लोकसभेच्या निवडणुकीत अजित पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाची कामगिरी चांगली झाली नाही, त्यातच बारामतीत त्यांच्या पत्नीलाच पराभवाला सामोरे जावे लागले. त्या पार्श्वभूमीवर आता विधानसभेच्या निवडणुकीत जागावाटपात त्यांचा पक्ष महायुतीतील अन्य दोन पक्षांना, म्हणजे भाजप आणि शिंदे यांच्या शिवसेनेला अडचणीचा वाटू लागला आहे. त्यामुळेच या दोन्ही पक्षांचे नेते आणि मंत्री देखील अजित पवारांच्या अर्थ खात्यावर आणि त्यांच्या पक्षावर उघड टीका करू लागले आहेत. लोकसभेच्या निवडणुकीत महायुती कमी पडली याचे खापर भाजपकडून अजित पवार यांच्यावर फोडले जात आहे. इंडिया टुडे'च्या मुंबई कॉनक्लेव्हमध्ये बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही लोकसभा निवडणुकीत भाजप कमकुवत पडला का या प्रश्नावर शिंदे यांच्या शिवसेनेची मते आम्हाला जास्त मिळाली. त्या तुलनेत अजित पवारांच्या राष्ट्रवादीची मते कमी मिळाली असे म्हटले आहे. भाजपच्या तुलनेत हे दोन्ही पक्ष मतदारांसाठी नवे असल्याने हे झाले अशी मल्लीनाथीही फडणवीस यांनी केली. अजित पवारांच्या राष्ट्रवादीची उपयुक्तता आता भाजपला राहिली नाही, त्यामुळे भाजप आणि शिंदे यांची शिवसेना त्या पक्षाला लक्ष्य करीत आहेत का? असा प्रश्न पडतो. या पार्श्वभूमीवर अजित पवारांची काही विधानेही राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरतात. करमाळयात त्यांच्या जनसन्मान यात्रेत त्यांनी शरद पवार हे आमचे दैवत आहेत, आम्ही चुकलो तर आमचे कान धरा' असे विधान केले. त्यावरुन अजित पवारांना महायुतीत येऊन चुकीचे काही केल्याचा पश्चात्ताप तर होत नाही ना अशी शंका येते.



गरज संपली?

शिंदे यांच्या शिवसेनेतील आमदाराने राहुल गांधी यांच्याबद्दल अश्लाघ्य भाषा वापरल्यानंतर अजित पवारांनी नापसंती व्यक्त केली होती, तर नितेश राणे यांनी मुस्लिम समाजाबद्दल टीका केल्यानंतर केंद्रातील वरिष्ठांकडे तक्रार करण्याचा इशारा दिला होता. त्यामुळेच अजित पवारांच्या मनात आता पुन्हा मूळ पक्षात जाण्यासंबंधी चलबिचल सुरू आहे का? असा प्रश्न पडतो. अलीकडेच अजित पवार यांनी आपण महायुतीसोबतच आहोत आणि महायुती म्हणूनच निवडणूक लढवणार आहोत असे सांगितले आहे. तथापि जागा वाटपात राष्ट्रवादीला समाधानकारक जागा न मिळाल्यास त्यांचे कार्यकर्ते काय भूमिका घेतील हा प्रश्न आहे. भाजपने आतापासूनच १६० ते १७० जागा लढवण्याची भाषा सुरू केली आहे. शिंदे यांच्या शिवसेनेला शंभर जागा हव्यात, अजित पवारांच्या राष्ट्रवादीची ६० जागांची मागणी असली तरी त्यांच्या वाट्याला केवळ २५-३० जागा येतील. अशा स्थितीत राष्ट्रवादी पक्ष काय करणार? महायुतीतून बाहेर पडून राष्ट्रवादी स्वतंत्रपणे निवडणूक लढवणार का? किंबहुना तसेच घडावे यासाठी भाजप आणि शिंदे यांची शिवसेना जाणीवपूर्वक प्रयत्न करत आहे का ? अशीही शंका येते. तसे झाल्यास भाजप आणि शिंदे यांच्या शिवसेनेला अधिक जागा मिळू शकतात. यासारख्या विधानातून अजित पवार आपला परतीचा मार्ग सुलभ करतात का, असे वाटल्यावाचून राहात नाही. महायुतीत सामील झाल्यापासूनच शिंदे यांच्या शिवसेनेकडून अजित पवार यांच्या राष्ट्रवादीशी खटके उडत आहे. निधी वाटपात आपल्यावर अजित पवारांनी अन्याय केल्याच्या तक्रारीही शिवसेनेच्या आमदारांनी केल्या होत्या. लोकसभेच्या निवडणुकीपासूनच अजित पवार गटाची कुचंबणा होत गेली. भाजप आणि शिंदे यांची शिवसेना हिंदुत्वाचे राजकारण करीत असताना वेगळी विचारधारा असलेल्या राष्ट्रवादीची राजकीय कोंडीच होत आहे. महायुतीत त्यांच्या पक्षाच्या अस्तित्वाला आव्हान दिले जात आहे. चाळीस आमदार पाठीशी असताना जागा वाटपात केवळ २० ते २५ जागांवर अजित पवार समाधान कसे मानणार? मग ते करणार तरी काय?

पान १ वरून

## महाराष्ट्रात...

निवडणुकीसाठी आपली निराशा झटकून टाका. कोणत्याही सर्वेक्षणाचा विचार करू नका. महाराष्ट्रात पुन्हा महायुतीचेच सरकार येईल. महाराष्ट्रात महायुतीचे सरकार येणार ही काळ्या दगडावरची रेघ आहे, असा ठाम आत्मविश्र्वास शहा यांनी या वेळी व्यक्त केला. महाराष्ट्रात सत्ता आल्यास देशात समान नागरी कायदा आणण्यापासून आपल्याला कोणीही रोखू शकत नाही, असेही शाह म्हणाले. भाजप केवळ राज्य करण्यासाठी सत्तेत नाही तर विचारधारेवर काम करण्यासाठी सत्तेत आहे. राम मंदिर, जम्मू-काश्मीरमधून कलम ३७० हटविणे हे काम करण्यासाठी भाजप सत्तेत आली.

भाजपचे सरकार आल्यानंतर गेल्या १० वर्षात दहशतवाद आणि नक्षलवाद गाडला गेला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामुळे जगात भारतीयांची मान अभिमानाने उंचावली आहे, असेही शहा यांनी सांगितले. या वेळी त्यांनी लोकसभा निवडणूक निकालाचे विश्र्लेषण केले. राज्यातील लोकसभेच्या ६ जागा अशा आहेत जिथे एका लोकसभेच्या ५ विधानसभा मतदारसंघात आपल्याला बहुमत आहे; पण एका ठिकाणी विरोधक बहुमत घेऊन जिंकले. याचा अर्थ सहापैकी पाच विधानसभा आपण जिंकू तर ते एकच जिंकतील, असेही अमित शहा म्हणाले. एक काळ असा होता की, लोकसभेत आपल्या फक्त दोन जागा होत्या त्यावेळीही आपला कार्यकर्ता पक्ष सोडून गेला नाही. ऐंशीच्या दशकातील कार्यकर्त्यांना माहिती असायचे, आपण निवडणूक हरणार आहोत तरीही काळजी नव्हती. आपण राजकारणात कुठल्याही पदासाठी आलेलो नाही. सरकार येते व जाते, पक्ष निती व विचार सोडतात, आपले सरकार १० वर्षे चालले; पण आपण विचार किंवा निती सोडली नाही, असे शाह म्हणले..

ओव्हर कॉन्फिडन्समुळे विकेट पडू देऊ नका : फडणवीस

आपले सगळे विरोधक एकत्र आले आहेत आणि जिंकण्यासाठी ते कोणतीही तडजोड करायला तयार आहेत त्यामुळे फाजील आत्मविश्र्वास ठेवू नका, गाफील राहू नका, असा इशारा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपा कार्यकर्त्यांना दिला. सरकारने केलेल्या कामामुळे लोक आपल्यासोबत आहेत. राज्यातील ३ कोटींपेक्षा जास्त लोक सरकारी योजनांचे लाभार्थी आहे. त्यांची मतं आपल्याला मिळाली तर राज्यात महायुतीचे सरकार पुन्हा येईल, असा विश्र्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. या वेळी फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावरही जोरदार टीका केली. उद्धव ठाकरे यांचा जनाधार संपलेला आहे. मराठी व हिंदू मते सोबत नसल्याने त्यांच्या रॅलीत हिरवे झेंडे नाचत आहेत, अशी टीका त्यांनी केली.

## महाराष्ट्रातील...

महाराष्ट्रात बीआरएस पक्षाचे काम हाती घेतले. राज्यात पक्ष वाढावा, यासाठी आम्ही प्रयत्नशील होतो. गेल्या दोन वर्षात पक्ष वाढविण्यासाठी खूप प्रयत्न केले. के. चंद्रशेखर राव यांच्या नेतृत्वाखाली घराघरात बीआरएस पक्ष पोहोचवला. परंतु, तेलंगणमधील बीआरएसचे सरकार गेले. तसेच आणखी काही कारणांमुळे महाराष्ट्रातील काम थांबलेले आहे असे बाळासाहेब देशमुख यांनी म्हटले आहे.

२२ लाख लोक सभासद म्हणून नोंदवले

महाराष्ट्रात आता निवडणुका होत आहेत. २२ लाख लोक सभासद म्हणून नोंदवले होते. पक्षाची भूमिका आम्ही लोकांपर्यंत पोहोचवले. तेलंगणात ज्या धर्तीवर काम झाले, तशाच पद्धतीने राज्यात काम करणारा शरद पवार यांचा पक्ष आहे. शरद पवार मोठे नेते आहेत. आता आमचे सगळ्यांचे एकमत झाल्यानंतर कार्यकर्त्यांशी चर्चा केली. यानंतर कार्यकर्त्यांसह शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला, अशी माहिती बाळासाहेब देशमुख यांनी दिली.

शरद पवार यांच्याशी ४० ते ४२ मिनिटे चर्चा

यासंदर्भात शरद पवार यांच्याशी ४० ते ४२ मिनिटे चर्चा झाली. अनेक विषयांवर चर्चा झाली. या बैठकीनंतर असे ठरविण्यात आले की, ०६ ऑक्टोबर रोजी एक मोठा मेळावा घेऊन शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली आम्ही सगळे कार्यकर्ते, नेते राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करणार आहोत. आमचा धागा आणि आमचा उद्देश समान आहे, असे बाळासाहेब देशमुख यांनी सांगितले. दरम्यान, राज्यभरात भारत राष्ट्र समितीच्या वतीने अधिकृतपणे नेमलेले पदाधिकारी यांनी एकत्रितपणे शरद पवार यांच्याशी चर्चा झाली. त्यानुसार आम्ही शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली त्यांच्या राष्ट्रवादी गटात प्रवेश करणार आहोत, असे बाळासाहेब देशमुख यांनी स्पष्टपणे सांगितले.

## मंदिर असो...

१५ दिवसांचा अवधी द्यावा. पण, रस्ते, पदपथ इत्यादींवर होणा-या बेकायदेशीर बांधकामांना आम्ही कोणतेही संरक्षण देणार नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांच्या युक्तिवादावर न्यायमूर्ती गवई म्हणाले की, आम्ही धर्मनिरपेक्ष व्यवस्थेत आहोत. बेकायदा बांधकाम हिंदूंचे असो वा मुस्लिमांचे. त्यावर कारवाई झालीच पाहिजे. मी मुंबईत न्यायाधीश असताना फूटपाथवरुन बेकायदा बांधकामे हटवण्याचे आदेश दिले होते. परंतु गुन्ह्यात आरोपी असणे, हा त्याचे घर पाडण्यासाठीचा आधार असू शकत नाही, हे समजून घेतले पाहिजे, असेही न्यायाधीशांनी स्पष्ट केले.

## लेबनॉनमध्ये...

युद्धाच्या काळात या भागात न जाण्याचे तसेच केंद्र सरकारने लेबनॉनमधील सर्व भारतीय नागरिकांना लवकरात लवकर बाहेर पडण्याचे आवाहन केले आहे.

## गरीब विद्यार्थ्यासाठी...

वडील मेरठच्या कापड कारखान्यात मजूर असून ते दिवसाला ४५० रुपये मिळवितात. त्यांच्यासाठी १७ हजार ५०० रुपयांची तरतूद करणे कठीण आहे. गावातील लोकांनी एकत्र येत शुल्कासाठीचे पैसे जमा केले होते, असा युक्तिवाद अतुल कुमार याच्यामार्फत त्यांच्या वकिलांनी केला.

उभय बाजूचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी प्रतिभाशाली युवकाची प्रतिभा वाया जाण्याची अनुमती दिली जाऊ शकत नाही असे सांगितले. पीडित युवक झारखंड कायदा सेवा प्राधिकरणात गेला, तेथून त्याला उच्च न्यायालयात पाठविण्यात आले, आता हा युवक सर्वोच्च न्यायालयात आला आहे. एका विद्यार्थ्याला एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणाकडे पाठविले जात आहे, असा शेरा मारत चंद्रचूड यांनी अतुल कुमार याला प्रवेश दिला जावा, असे आदेश दिले.

## संभाजीराजेंच्या...

यामध्ये त्यांनी लिहिले आहे की, ९ ऑगस्ट २०२२ रोजी तुळजाभवानी मातेच्या साक्षीने आणि हजारो शेतकरी, कष्टक-यांच्या साथीने स्थापन झालेली स्वराज्य संघटना आता भारतीय निवडणूक आयोगाकडे ङ्गमहाराष्ट्र स्वराज्य पक्षफ या नावाने एक राजकीय पक्ष म्हणून अधिकृतपणे नोंदणीकृत झालेला आहे. स्वराज्य संघटना आजपासूनङ्गमहाराष्ट्र स्वराज्य पक्षफ म्हणून ओळखला जाईल.

याचबरोबर, आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्र स्वराज्य पक्षाला ङ्गसप्तकिरणांसह पेनाची निबफ हे निवडणूक चिन्ह प्राप्त झालेले आहे. मागील वर्षभरात आपण आपली संघटना एक पक्ष म्हणून घराघरांत पोहोचली आहे, आता अधिक जोमाने आपल्याला मिळालेले निवडणूक चिन्ह देखील सर्व मतदारांपर्यंत पोहोचवणे आपले कर्तव्य आहे. महाराष्ट्रातील जनतेचे आपल्यावर असलेले प्रेम, पक्ष संघटनेचे कार्यकर्ते व हितचिंतकांचे कष्ट, राज्याच्या राजकारणाला असलेली एका नवीन व सुसंस्कृत पर्यायाची आवश्यकता ही आगामी विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्र स्वराज्य पक्षाच्या उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करत परिवर्तन महाशक्तीस सत्तास्थानी घेऊन जाईल, असे संभाजीराजे यांनी म्हटले आहे.

## मुंबईकरांच्या...

पहिले मुंबईकरांचा विरोध असताना टेंडरमध्ये सोयीस्करपणे बदल करून अदानींना धारावीची जागा दिली आणि नंतर धारावी पुनर्विकासाच्या आडून मुंबईतील जवळपास १५०० एकर जागा अदानींच्या घशात घातली. आता मिठागरे देऊन अजून एक हजार कोटी रुपयांचा महाघोटाळा मोदानी अँड कंपनीने केला आहे, असा भ्रष्टाचाराचा आरोप गायकवाड यांनी केला आहे.

## घड्याळ...

पवार यांच्या सोबत गेल्याचा दावा करण्यात आला. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे नाव आणि घड्याळ चिन्ह यावर शरद पवार आणि अजित पवार यांच्या निवडणूक आयोगापुढे संघर्ष सुरू झाला. त्यात अजित पवारांना पक्षाचे नाव आणि चिन्ह आयोगाकडून बहाल करण्यात आले. या निर्णयाला शरद पवार गटाने सुप्रीम कोर्टात आव्हान दिले. 'घड्याळ' चिन्ह वापरण्याबाबत शरद पवार गटाने आक्षेप घेतला आहे.

# लाडकी बहीण साठी

## आदिवासींच्या बजेटवर डल्ला

नाशिक : प्रतिनिधी- राज्यातील मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत पात्र महिलांना शासनातर्फे दरमहा १५०० रुपये दिले जाणार आहेत. योजनेवरून विरोधक टीका करताना दिसत आहेत. त्यातच ङ्गलाडकी बहीणफ साठी आदिवासींच्या पैशावर डल्ला मारला असे आरोप वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी राज्य सरकारवर केला आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या सर्वच राजकीय नेते हे आखाड्यात उतरले आहेत. त्यातच आता प्रकाश आंबेडकर यांनी नाशिकमध्ये पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांनी अनेक विषयांवर भाष्य केले. यावेळी त्यांनी लाडकी बहीण योजनेला कोणते पैसे दिले जातात याबद्दलही मोठा खुलासा केला. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस जे करायला निघाले, ते कायदेशीर नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात सव्वा लाख बोगस आदिवासी असल्याचे आढळले. आदिवासी समाजाचे मोर्चे आले, भरती, जागा ताबडतोब भरणे या सर्व गोष्टी झाल्या. पण लाडक्या बहिणीसाठी आदिवासींचे बजेट वर्ग केले जात आहे, असा गौप्यस्फोट प्रकाश आंबेडकरांनी केला.

# उदयगिरी अकॅडमीच्या वतीने प्रशांत जोगदंडचा सत्कार



उदगीर (प्रतिनिधी) उदयगिरी अकॅडमीचा माजी विद्यार्थी प्रशांत जोगदंड याची बृहन्मुंबई महानगरपालिका येथे कनिष्ठ लघुलेखक म्हणुन निवड झाल्याबद्दल त्याचा सत्कार उदयगिरी अकॅडमीचे संचालक प्रा.गोपाळकृष्ण घोडके सर यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

या प्रसंगी प्रा. संतोष पाटील, प्रा.धनंजय पाटील, प्रा. श्रीगण रेड्डी हे उपस्थित होते. तीच्या निवड बद्दल प्रा. ज्योती खिंडे प्रा. मीना हुरदळे , प्रा. नंदिनी निटुरे , प्रा.निवेदिता भंडारे यांनी अभिनंदन केले व भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## जाहीर प्रगटन

लातूर जिल्हा व विशेषतः उदगीर तालुका परिसरातील सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सूचीत करण्यात येते की,

माझे नाव अमीतकुमार शंकरराव पाटील तसेच आधार कार्ड वर नाव अमीतकुमार शंकरराव पाटील आहे तसेच पॅन कार्ड वर पाटील अमीत कुमार शंकरराव असे झाले आहे माझे बजाज इंसुरन्स कं च्या पॉलिसी मध्ये माझ्या नावाचा उल्लेख अमीतकुमार पाटील आसा झाला आहे सदरील सर्व नावे माझीच असून तो व्यक्ती मी एकटाच आहे इतर कोन्ही इसम नाही जर या नावाचा इसम दूसरा कोन्ही व्यक्ती निघाल्यास त्यास सर्वस्वी मी जवाबदार राहीत म्हणून सबब जाहीर प्रगटण देण्यात येते.

कृपया याची नोंद घ्यावी म्हणून सवव हे जाहीर प्रगटन.

दिनांक ०१/१०/२०२४

| तर्फे | जाहीर प्रगटन देणार |
|---|---|
| ॲड. काळेगोरे पी.पी. | अमीतकुमार शंकरराव पाटील |
| उदगीर न्यायालय | मो. ८९९९६८०५४६ |

## वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

**मा. बी.आर.झेंडे, ४ थे दिवाणी न्यायाधीश क.स्तर उदगीर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.७९२/२०२४ नि.क्र. ०७

ज्याअर्थी नामे Vilas Mahalingappa Burande हे दिनांक ०७.०६.२०२४ रोजी व Vidyawati Vilas Burande हे दिनांक २०/१०/२०१२ रोजी Udgir, Tq.Udgir Dsit.Latur येथे मयत झाले आहेत व अर्जदार Nitin Vilas Burande, Age 38 yrs, Occu. Business, Applicant R/o Udgir, Tq.Udgir Dist.Latur.

यांनी खालील नमुद एकमेव व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असून,

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1 | Nitin Vilas Burande | 38 | Son |

अर्जदार याने Vilas Mahalingappa Burande या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Vilas Mahalingappa Burande याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०१/१०/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख ०८/११/२०२४

| ए.बी. सुर्यवंशी | एम.एल.सुत्राळे |
|---|---|
| कनिष्ठ लिपीक | सहाय्यक अधिक्षक |
| ४ थे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर | सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर |

## *वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहीरनामा*

**मा. २ रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर अहमदपूर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ५१३/२०२४
निशाणी क्र. ०७

ज्याअर्थी मयत लक्ष्मी भ्र. रामराव कंदरफळे हे दि. १५.११.२०१६रोजी कुमठा (बु) ता.अहमदपुर जि.लातूर येथे मयत झाले आहेत व अर्जदार रामराव पि. मष्णाजी कंदरफळे यांनी खालील नमुद ११ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून

| अ.क्र. | वारसदारांचे नाव | वय | मयताशी असलेले संबंध |
|---|---|---|---|
| ०१ | रामराव पि. मष्णाजी कंदरफळे | ७२ | पती |
| ०२ | अमोल पि. रामराव कंदरफळे | ४० | मुलगा |
| ०३ | सरोजा भ्र. मारोती डोंगरे | ४८ | मुलगी |
| ०४ | सुरेखा (आशा) भ्र. अशोक कंदगुळे | ४६ | मुलगी |
| ०५ | मिना भ्र. बालाजी सुर्यवंशी | ४४ | मुलगी |
| ०६ | बालिका भ्र. शामराव सुरवसे | ४२ | मुलगी |
| ०७ | शामा (रेखा) भ्र. वैजनाथ म्हेत्रे | ४० | मुलगी |
| ०८ | स्वाती भ्र. बब्रुवान कंदरफळे | ३७ | सुन |
| ०९ | स्विटी (श्वेता) पि. बब्रुवान कंदरफळे | २० | नात |
| १० | किरण पि. बब्रुवान कंदरफळे | १८ | नात |
| ११ | श्रेयस पि. बब्रुवान कंदरफळे | १३ | नातु |

अर्जदार यांना भिमाशंकर हावगीराव सावरगावे यांचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केला आहे

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या. आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू भिमाशंकर हावगीराव सावरगावे याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी

आज दि ३००९.२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

| कनिष्ठ लिपिक | सहाय्यक अधिक्षक |
|---|---|
| सहदिवाणी न्यायालय क.स्तर, अहमदपूर | सहदिवाणी न्यायालय क.स्तर अहमदपूर |

## जाहीर नोटीस

**जिल्हा न्यायाधीश-०१ व मोटार अपघात न्यायालय, उदगीर यांचे न्यायालयात**

M.C.A.11/202023
तमीजाबी वि मकबुलबी व इतर
नि.क्र. ७५

प्रति
१२. अब्दुल रौफ रसुल शेख,
रा. आझाद नगर, उदगीर
२०. चंद्रकला आनंतराव गायकवाड
रा. आझाद नगर, उदगीर
२३. दत्तात्र मल्हारी गायकवाड
रा. आझाद नगर, उदगीर
२७. मतिन अब्दुल गणी चौधरी
रा. आझाद नगर, उदगीर

सदरच्या जाहिर प्रगटानाव्दारे आपणास कळविण्यात येते की, तमिजाबी मंजुर अहमद खान रा. दबीरपुरा उदगीर यांनी आपल्याविरूध्द सदर न्यायालयात दिवाणी किरकोळ अपिल दाखल केला आहे. त्यामध्ये आपण गैरअर्जदार क. १२. २०. २३ व २७ आहात आपणारा न्यायालयामार्फ्रत ब-याच वेळा नोटिस काढली असता सदर नोटीस तामील होत नसल्याने अर्जदाराचे विधीज्ञांनी आपल्याविरुध्द जाहिर नोटिस काढण्यासंबंधी या न्यायालयास अर्ज केला आहे. तो अर्ज न्यायालयाने मंजुर केला असून तुम्हास या जाहिर नोटिसव्दारे कळविण्यात येते कि, तुम्ही दि. १६/११/२०२४ रोजी सकाळी १०.३० वा. जिल्हा न्यायाधीश-०१ व मोटार अपघात न्यायालय, उदगीर येथे स्वत किवा वकिलामार्फ्रत हजर रहावे व आपले म्हणणे मुदतीत सादर करावे अन्यथा आपले काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन आपल्या गैरहजेरित या अर्जाची सुनावणी होवून आपल्या विरुध्द एकतर्फ्रा आदेश पारित केला जाईल

आज दि १९/०९/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

| (श्री.बी.एस.समशेट्टे) | श्री. एस.बी. मोरे |
|---|---|
| कनिष्ठ लिपिक | अधिक्षक |
| जिल्हा न्यायालय-१ उदगीर | जिल्हा न्यायालय-१ उदगीर |

## *तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार उदगीर यांचे कार्यालय*

(दंडणीय- विभाग )

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.२४/०९/२०२४

### जाहीरनामा

